# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०२४

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक १० जुलै, २०२४ / आषाढ १९, १९४६ (शके)**

**मुख्यमंत्री } यांचे प्रभारी विभाग**

**प्रश्नांची एकूण संख्या - ४६**

## मुंबईतील रस्ते काँक्रिटीकरणाच्या कामांच्या निविदा प्रक्रियेमध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(१)** * **२३२२० श्री.प्रसाद लाड, श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील रस्ते खड्डेमुक्त करण्यासाठी शासनाकडून पहिल्या टप्प्यामध्ये ३९८ रस्ते सिमेंट-काँक्रिटचे करण्यासाठी निविदा काढण्यात आल्या असून, दुसऱ्या टप्प्यामध्ये ४४७ रस्ते सिमेंट-काँक्रिटचे करण्यासाठी काढण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेमध्ये पहिल्या टप्प्यातील रस्त्यांचा समावेश करण्यात आला असल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पहिल्या टप्प्यातील ३९८ रस्त्यांच्या सिमेंट काँक्रिटीकरणाची कामे २० ते २५ टक्के सुध्दा पूर्ण करण्यात आली नसून, पहिल्या टप्प्यामध्ये समाविष्ट असलेल्या दहिसर येथील राजाराम माने मार्ग तसेच म्हात्रे वाडीतील १० रस्त्यांचे काम सुरु असतानाही पुन्हा दुसऱ्या टप्प्यांमध्ये त्याच रस्त्यांच्या निविदा काढण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून रुपये ६००० कोटींची कामे करण्यात येत असून अधिकारी व कंत्राटदार यांच्या संगनमताने शासनाच्या निधीमध्ये अनियमितता करण्यात येत असल्याने सदर चौकशीची अंमलबजावणी संचालनालयामार्फत (ईडी) करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रस्ते कंत्राटात कंत्राटदार हमी कालावधीकडे दुर्लक्ष करित असल्याचे निदर्शनास आले असून हमी कालावधीत रस्त्यावर खड्डा पडल्यास कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने घेतला आहे काय,

(५) असल्यास, मुंबईतील रस्ते कॉंक्रिटीकरणाची पूर्वीच्या कंत्राटातील कामे प्रलंबित असतानाही बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने पुन:श्च हजारो कोटी रुपयांच्या कामांसाठी निविदा मागविल्या, यापूर्वी मा.पंतप्रधान महोदयांनी भूमिपूजन केलेल्या रस्त्यांची कामे पूर्ण न करता नवीन कामांच्या निविदा काढण्याची कारणे काय आहेत, तसेच सदर रस्त्यांची कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पहिल्या टप्प्यातील रस्ते कॉंक्रिटीकरणाच्या कामामध्ये दिरंगाई करणाऱ्या कंत्राटदारांना देण्यात आलेले कंत्राट रद्द करुन शासनाच्या निधीमध्ये अनियमितता करणाऱ्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दोषी अधिकारी व कर्मचारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील रस्ते खड्डे मुक्त करण्यासाठी पहिल्या टप्प्यामध्ये पश्चिम उपनगरातील ५१६, पूर्व उपनगरातील १८२ व शहर विभागातील २१२ रस्ते समाविष्ट केले होते.

दुसऱ्या टप्प्यामध्ये पश्चिम उपनगरातील ६५६, पूर्व उपनगरातील २६१ व शहर विभागातील २९५ रस्ते समाविष्ट केले आहेत.

पहिल्या टप्प्यातील शहर विभागातील २१२ रस्त्यांचे कंत्राट रद्द करण्यात आले आहे. शहर विभागातील रद्द केलेल्या कंत्राटाऐवजी २०८ रस्त्यांची नवीन निविदा मागविण्यात आलेली आहे.

दोन्ही टप्प्यांतील रस्ते वेगवेगळे असून, पहिल्या टप्प्यातील कोणत्याही रस्त्याचा दुसऱ्या टप्प्यातील कामांमध्ये समावेश केलेला नाही.

(२) पहिल्या टप्प्यातील एकूण ११४ रस्त्यांची कामे पूर्णत्वास येत असून, पश्चिम उपनगरात २४६ व पूर्व उपनगरात ८९ रस्त्यांची कामे सुरु आहेत.

पहिल्या टप्प्यामध्ये दहिसर येथील राजाराम माने मार्ग असा रस्ता सिमेंट कॉंक्रिटीकरणासाठी घेतलेला नाही. तसेच म्हात्रे वाडीतील ९ रस्त्यांचे डांबरीकरण पुन:पृष्ठीकरण करण्याचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात आले आहे. सदर ९ रस्त्यांचा समावेश दुसऱ्या टप्प्याच्या निविदेमध्ये कॉंक्रिटीकरण करण्यात आला आहे. पुन:पृष्ठीकरण करण्यात आलेल्या रस्त्यांचा दोषदायित्व कालावधी पूर्ण झाल्यानंतर सदर रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रिटीकरण करण्यात येणार आहे.

(३) हे खरे आहे.

(४) हमी कालावधीतील रस्त्यावर खड्डा पडल्यास संबंधित कंत्राटदाराकडून योग्य ती दुरुस्ती विनामूल्य करुन घेण्यात येते. तसेच याबाबत कंत्राटदाराकडून दिरंगाई झाल्यास संबंधित कंत्राटदारावर निविदेतील अटी व शर्तींनुसार दंडात्मक कारवाई करण्यात येते.

(५) मुंबई शहरातील रस्ते खड्डे मुक्त करण्यासाठी सर्व रस्ते टप्प्याटप्प्याने सिमेंट कॉंक्रिटमध्ये करण्याचे प्रस्तावित आहे व त्याप्रमाणे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

पहिल्या टप्प्यातील ३९७ कि.मी. रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रिटीकरण करण्यासाठी मागविण्यात आलेल्या ५ निविदांपैकी ४ निविदांतील रस्त्यांची कामे प्रगतीपथावर असून, निविदेमध्ये नमूद केलेल्या

कालावधीदरम्यान सदर कामे पूर्ण करण्यात येणार आहेत.

(६) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत शहर विभागातील पहिल्या टप्प्यात रस्त्याच्या कामाकरीता नेमण्यात आलेल्या कंत्राटदार मे. रोडवेज सोल्यूशन इंडिया इन्फ्रा. लि. यांच्या रस्त्यांच्या कामाची प्रगती समाधानकारक नसल्यामुळे व त्यांनी निविदेतील अटी व शर्तींचे पालन न केल्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सदर कंत्राटदाराचे कंत्राट रद्द करुन कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे व त्याची अनामत व कंत्राट रक्कम जप्त करण्यात आली आहे. सदर प्रकरणी लवादाकडे सुनावणी सुरु असून, लवादाच्या आदेशानुसार पुढील कारवाई करण्यात येणार आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सामूहिक जैव वैद्यकीय व्यवस्थापन केंद्रात येणाऱ्या कचऱ्याचे व्यवस्थापन करण्याबाबत

**(२) * २३५१० प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सामूहिक जैव वैद्यकीय व्यवस्थापन केंद्रात येणारा काही जैव वैद्यकीय कचरा सन २०१६ च्या नियमानुसार वर्गीकरण होऊन येत नसल्याचे सामूहिक जैव वैद्यकीय केंद्राच्या भेटीत नोंदविण्यात आल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने (एमपीसीबी) या सर्व्हेक्षणाची जबाबदारी आयआयटी मुंबईवर सोपविली असून या कचऱ्याचे सुरक्षित आणि पर्यावरणदृष्ट्या योग्य पध्दतीने व्यवस्थापन व्हावे यासाठी एमपीसीबीने कठोर मार्गदर्शक तत्वे जारी केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सामूहिक जैव वैद्यकीय केंद्रामधील कर्मचारी सदर कचऱ्याचे वर्गीकरण करतात त्यामुळे या कर्मचाऱ्यांसह नागरिकांचे आरोग्य आणि पर्यावरण या दोन्हींना धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास मुंबईतील अनेक मोठ्या रुग्णालयांकडून नियमांचे पालन होत नसल्याने या नियमाची अंमलबजावणी आता कठोर होणार असून कचऱ्याचे स्त्रोतापाशी विलगीकरण करणे, बारकोडींग होणे इ. बाबी आवश्यक असल्याचे प्रदूषण नियंत्रण मंडळाने स्पष्ट केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, अंशतः हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन नियम २०१६, अनुसूचि तीन नुसार सामुहिक जैव वैद्यकीय कचरा प्रकिया केंद्राचे त्रयस्थ पक्षाद्वारे परिक्षण करण्याचे कार्य आयआयटी मुंबईला दिले होते. व त्यामध्ये नोंदविलेल्या निरिक्षणाच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने राज्यातील सर्व वैद्यकीय आस्थापनांना वर्तमान पत्रातून बातमीद्वारे अवगत केले.

(३) हे खरे नाही.

सामूहिक जैव वैद्यकीय कचरा प्रकिया केंद्रामधील कार्यरत कर्मचारी जैव वैद्यकीय कचऱ्याचे वर्गीकरण वैयक्तिक संरक्षणात्मक उपकरणे वापरुन केली जातात. तसेच प्रक्रिया केंद्रातील कर्मचाऱ्यांचे वार्षिक वैद्यकीय तपासणी प्रकिया केंद्रामार्फत केली जाते व त्यांना गरजेच्या लसी दिल्या जातात व त्याची नोंद प्रक्रीया केंद्राकडे ठेवली जाते.

(४) व (५) होय हे खरे आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने राज्यातील सर्व वैद्यकीय आस्थापनांना कचऱ्याचे स्त्रोतापाशी विलगीकरण करणे, बारकोडींग होणे इ. बाबी आवश्यक असल्याचे वर्तमान पत्रातून बातमीद्वारे,प्रत्यक्ष बैठकामध्ये स्पष्ट केले आहे. तसेच महाराष्ट्रातील सर्व जैव वैद्यकीय कचरा प्रकिया केंद्रांना त्यांच्या अतर्गत येणाऱ्या वैद्यकीय आस्थापनांना नियमितपणे कचरा विलगीकरण करण्यासंदर्भात व बारकोड प्रशिक्षण देण्याबाबत निर्देश दिले आहेत.

जैव वैद्यकीय कचरा प्रकिया केंद्रकडून त्यांना वेळोवेळी प्रशिक्षण दिले जाते. तसेच वैद्यकीय आस्थापनांना जैव वैद्यकीय कचरा प्रकिया केंद्रकडून वर्गीकरण कसे करावे या बाबतचे छायाचित्रफलक पुरविले जातात.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेमार्फत बायोमायनिंग प्रकल्पासाठी राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेबाबत

**(३) * २३८८७ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेमार्फत शहरात जमा होणाऱ्या दहा लाख मे.टन कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी बायोमायनिंग प्रकल्प सुरु करण्याकरीता निविदा प्रक्रिया राबविण्यात आली असल्याचे माहे मे, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेण्याऱ्या कंत्राटदारांसाठी ६ लाख मे.टनाचे प्रकल्प, ५ लाख मे.टनाचे दोन प्रकल्प अथवा ४ लाख मे.टनाचे ३ प्रकल्पावर यापुर्वी काम करणे आवश्यक व स्वतःच्या मालकीची यंत्रसामुग्री असावी अशा जाचक अटी व शर्तीचा समावेश करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कंत्राटदारांना आवश्यक असलेली यंत्रसामुग्री भाडेतत्वावर घेणे शक्य असताना महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचारी यांनी संगनमत करुन काही ठराविक कंत्राटदारांना कामे मिळण्याच्या दृष्टीने कंत्राटदाराच्या स्वतःच्या मालकीचे यंत्रसामुग्री याबाबतच्या अटी घालण्यात आल्यामुळे अनेक कंत्राटदारांना सदरहू कामाचा अनुभव असूनही उक्त कामापासून वंचित राहावे लागले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कंत्राटदारांना स्वतःच्या मालकीची यंत्रसामुग्री ही अट शिथील करुन स्पर्धात्मकरित्या निविदा प्रक्रिया राबविण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, अंशत: खरे आहे.

सदरील निविदा दिनांक ४ मार्च, २०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

(२) व (३) महानगरपालिकेकडून निविदा प्रक्रियेमध्ये सदर अटींचा समावेश हा केंद्र शासनाच्या याबाबतच्या माहे फेब्रुवारी, २०२४ मधील मार्गदर्शक सुचनांनुसार करण्यात आला आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अध्यक्ष पदावरील नियुक्तीबाबत

**(४) * २३६१८ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अध्यक्षपदाकरीता आवश्यक असलेली अर्हता नसतानाही श्री.सिध्देश कदम यांची मंडळाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आल्याचे माहे एप्रिल,२०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अध्यक्ष पदावर श्री.सिध्देश कदम यांची अर्हता नसताना नियुक्ती करण्यामागची कारणे काय आहेत, असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने नियमांचे उल्लंघन करुन करण्यात आलेली नियुक्ती रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) श्री.सिद्धेश रामदास कदम यांची शैक्षणिक पात्रता व अनुभव यांचा विचार करता श्री.कदम यांची महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अध्यक्षपदी दिनांक ६ मार्च, २०२४ च्या अधिसूचनेद्वारे नियुक्ती करण्यात आली आहे.

-----------------

## सामाजिक न्याय विभागांतर्गतच्या मराठवाड्यातील वसतिगृहांतील विद्यार्थ्यांना भौतिक सोयी -सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(५) * २३०५५ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत मराठवाडा विभागात असलेल्या ५१ वसतिगृहांमध्ये सुमारे ६००० विद्यार्थी वास्तव्य करीत असून आवश्यक असणाऱ्या सोई-सुविधा त्यांना वसतिगृहात उपलब्ध होत नसल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतींची देखभाल दुरुस्ती तसेच संरचनात्मक परिक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) होत नसून यासंदर्भात विद्यार्थ्यांनी तक्रार केल्यास त्यांचे व्यवस्थापनाकडून शोषण करण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, किले अर्क संभाजीनगर येथील रुम नं.२१ चे छत दिनांक १० जानेवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास कोसळल्याने विद्यार्थी जखमी झाले असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने वसतिगृहात येणारे बहुतांश विद्यार्थी हे ग्रामीण भागातून व गोरगरीब कुटुंबातून येत असून विद्यार्थ्यांना नियमाप्रमाणे सोई-सुविधा मिळण्याच्या दृष्टीने तसेच सदर इमारतींची देखभाल दुरुस्ती, इमारतींचे संरचनात्मक परिक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) नियमितपणे करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) नाही.
(२) नाही.

सदर इमारतींचे संरचनात्मक परिक्षण करण्यात आलेले नाही. तथापि, छत्रपती संभाजीनगर मधील किलेअर्क, येथील शासकीय वसतिगृह इमारतींची सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पाहणी करण्यात आली असून, सा.बां. विभागाने दिलेल्या सूचना विचारात घेऊन सदर इमारतींच्या दुरूस्तीसाठी आवश्यक रक्कम मंजूर करणेबाबतची कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे. तसेच, वसतिगृहातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या तक्रारींचे तात्काळ निराकरण करण्यात येत असून, वसतिगृह व्यवस्थापनाकडून कोणतेही शोषण केले जात नाही.
(३) होय.

दिनांक १०/०१/२०२४ रोजी वसतिगृह इमारत छताच्या प्लॅस्टरचा तुकडा पायावर पडून विद्यार्थी जखमी झाल्याची माहिती मिळताच संबंधित विद्यार्थ्याला उपचारासाठी रूग्णालयात दाखल करून आवश्यक उपचार करण्यात आले असून तपासणी अंती दुखापत गंभीर नसल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच, सद्य:स्थितीत सदर विद्यार्थी सुस्थितीत आहे.
(४) सामाजिक न्याय विभागांतर्गत राज्यातील शासकीय वसतिगृहे व शासकीय निवासी शाळांच्या इमारतींचे संरचनात्मक परिरक्षण (Structural Audit), फायर ऑडीट व इलेक्ट्रीक ऑडीट संबंधित यंत्रणांकडून नियमितपणे करून घेण्याचे निर्देश आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांनी सर्व क्षेत्रिय कार्यालयांना दिलेले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या विविध योजनांकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(६) * २२९३१ श्री.धीरज लिंगाडे, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.सुधाकर अडबाले, श्री.अरुण लाड, डॉ.प्रज्ञा सातव, श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेतर्फे (बार्टी) घेण्यात येणारे एमपीएससी, यूपीएससी, आयबीपीएस व पोलीस भरतीचे प्रशिक्षण कार्यक्रम निधीअभावी प्रलंबित असून हजारो विद्यार्थी प्रशिक्षणापासून वंचित असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने सन २०२० मध्ये जाहीर केलेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये संशोधनाला प्राधान्य देण्यात आले असताना देखील राज्यातील बार्टी सारख्या महत्त्वाच्या संशोधन संस्थेमध्ये संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती न मिळाल्याने आर्थिक विवंचनेचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाकडून सन २०२३ -२४ या वर्षात 'बार्टी' या संस्थेसाठी रुपये ३६५ कोटी मंजूर झालेले आहेत, त्यापैकी केवळ रुपये ७५ कोटींचा निधी मिळालेला असून उर्वरित निधी वितरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, सदर संस्थेचे काही प्रशिक्षण कार्यक्रम निधीअभावी बंद असून विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीही प्रलंबित असल्यामुळे मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणावर विपरित परिणाम होत आहे, त्यासंदर्भात विद्यार्थ्यांनी माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान अनेक दिवस मुंबईतील आझाद मैदानात धरणे आंदोलन केले होते, या आंदोलनाची दखल सामाजिक न्याय विभागाने घेतली नसल्याने या विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान भरून काढण्याची मागणी सर्वसामान्य जनतेतून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सन २०२३- २४ च्या आर्थिक वर्षात बार्टीसाठी देण्यात आलेला रुपये ३६५ कोटींचा निधी वितरीत करून बार्टी या संस्थेच्या सर्व विद्यार्थ्यांची प्रलंबित असलेली शिष्यवृत्ती अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती २०२१ अंतर्गत दिनांक १२/०४/२०२३ रोजीच्या शासन पत्रानुसार एकूण ८६१ विद्यार्थ्यांना फेलोशिप देण्यात येत आहे.
(५) विद्यापीठ अनुदान आयोग (U.G.C) यांच्या मार्गदर्शक सुचनानुसार अधिछात्रवृत्ती रक्कम अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील अनेक नर्सिंग होमची नोंदणी नसल्याबाबत

**(७) * २३३७२ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.सुनिल शिंदे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या गोवंडी, मानखुर्द या एम (पूर्व) विभागातील ३४ नर्सिंग होमसह महानगरपालिका क्षेत्रातील अनेक नर्सिंग होमची आजपर्यंत आरोग्य विभागाकडे नोंदणीच झाली नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगरपालिका क्षेत्रात कार्यरत नर्सिंग होमच्या नोंदी ठेवण्याबाबत आरोग्य विभागाकडून झालेल्या दुर्लक्षामुळे रुग्णांवर चुकीचे उपचार होत असून, बृहन्मुंबई महानगरपालिका व शासकीय रुग्णालयात पूरक मनुष्यबळ, औषधांअभावी रुग्ण खाजगी रुग्णालयांमध्ये जात असल्याने अनेक नर्सिंग होम किंवा क्लिनिक विनापरवानगी सुरू असून रुग्णांची हेळसांड होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नर्सिंग होम किंवा क्लिनिकसाठी परवानगी देण्याची वा त्याची नोंदणी तपासण्याची जबाबदारी महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाची असून अशा प्रकारच्या क्लिनिक किंवा नर्सिंग होम मध्ये कार्यरत असणारे डॉक्टर किंवा सहाय्यक अनुभवी व वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ आहेत काय, याची माहिती देखील प्रशासनाकडे उपलब्ध नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आग प्रतिबंधक आणि जीव सुरक्षा कायद्यांतर्गत मुंबईतील सर्व रुग्णालयांना दर सहा महिन्यांनी फायर ऑडिट करणे बंधनकारक असताना अशा बेकायदेशीर नर्सिंग होम अथवा क्लिनिकमध्ये त्याची अंमलबजावणी होत नसून रुग्णांना उपलब्ध होणारी वैद्यकीय सुविधा तसेच औषधे मान्यताप्राप्त आहेत याची तपासणी अशा रुग्णालयात होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नर्सिंग होमचे सर्वेक्षण करण्याबाबत तसेच मुंबईकरांच्या आरोग्याच्या दृष्टीने अशा प्रकारच्या अनधिकृत नर्सिंग होमवर कारवाई करून मुंबईतील नागरिकांना अद्ययावत आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

मुंबईतील एम/पूर्व विभागात ४१ नोंदणीकृत व नोंदणी न झालेले २० खाजगी नर्सिंग होम आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.

एम/पूर्व विभागातील नोंदणी न झालेल्या खाजगी नर्सिंग होमची बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पाहणी केली असता, सदर नर्सिंग होममध्ये प्रशिक्षित डॉक्टर आणि परिचारीका काम करत असल्याचे आढळून आले आहे.
(४) हे खरे नाही.

नोंदणी न झालेल्या नर्सिंग होमची वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचेमार्फत पाहणी केली जाते.

सदर नर्सिंग होम झोपडपट्टी सदृश परिसरात असून, नर्सिंग होम चालकांकडे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या इमारत बांधकाम विभागाकडून मंजूर आराखडा / वापरकर्ता बदल प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यामुळे अग्निशमन विभागाकडून प्रमाणपत्र दिले जात नाही.

महाराष्ट्र अग्निप्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ च्या कलम ३ उपकलम १ नुसार सदर नर्सिंग होमची अग्निसुरक्षा यंत्रणा सुस्थितीत व कार्यान्वित ठेवण्याचे दायित्व संबंधित भोगवटादार व मालक यांचे असते. तसेच महाराष्ट्र अग्निप्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम

२००६ च्या कलम ३ उपकलम १ नुसार नर्सिंग होम / क्लिनिक यांना प्रत्येक वर्षी जानेवारी व जुलै महिन्यामध्ये शासन मान्यताप्राप्त परवानाधारक अभिकरणाकडून अग्निसुरक्षा यंत्रणा सुस्थितीत व कार्यान्वित असल्याचे "प्रपत्र ब" प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे.

(५) एम/पूर्व विभागातील नागरिकांना अद्ययावत आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत गोवंडी येथील पंडित मदन मोहन मालविय (शताब्दी रुग्णालय) च्या खाटांची संख्या २१५ वरुन ७९५ इतकी करण्यात येणार आहे. सदर रुग्णालयाच्या अतिरिक्त इमारतीचे काम पूर्णत्वास आले असून, सदर ठिकाणी अल्पावधीत आरोग्य सेवा सुरु करण्याचे प्रस्तावित आहे.

तसेच मानखुर्द येथील लल्लूभाई कंपाऊंड येथे एमएमआरडीए मार्फत साधारणत: ४१० खाटांचे रुग्णालय तयार करण्यात आले असून, ते बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात येणार आहे. सदर ठिकाणी अल्पावधीत आरोग्य सेवा सुरु करण्याचे प्रस्तावित आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील महालक्ष्मी रेसकोर्सवरील घोड्यांच्या तबेल्यांच्या पुनर्बांधणी व झोपड्यांच्या पुनर्वसनाबाबत

**(८) * २२९६० श्री.सुनिल शिंदे, श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, प्रा.राम शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक २१९५० ला दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महालक्ष्मी रेसकोर्सच्या १२० एकर जागेतील भूखंडाच्या भाडेपट्ट्याचे नूतनीकरण करण्यास तसेच उर्वरित भूखंडावर आंतरराष्ट्रीय दर्जाचे भव्य 'मुंबई सेंट्रल पार्क' विकसित करण्यास शासनाने दिनांक १२ मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अधिसूचनेमुळे महालक्ष्मी रेसकोर्स येथील भूखंडाचे नूतनीकरण करून पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना आखल्या आहेत, असल्यास त्याचे स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, महालक्ष्मी रेसकोर्सवर उभारल्या जाणाऱ्या सेंट्रल पार्कसाठी 'रॉयल वेस्टर्न टर्फ क्लब लिमिटेड' च्या परिसरातील घोड्यांचे तबेले, तसेच झोपड्या पाडाव्या लागणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, 'रॉयल वेस्टर्न टर्फ क्लब लिमिटेड'ने तबेले पाडण्याचा आणि पुनर्बांधणीचा तसेच झोपड्यांच्या पुनर्वसनाचा खर्च शासनाने किंवा बृहन्मुंबई महानगरपालिकेने करावा, अशी मागणी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू तबेले पाडणे आणि पुनर्बांधणीसाठी तसेच येथील झोपड्यांच्या पुनर्विकासासाठी किती रुपयांचा खर्च अपेक्षित आहे आणि हा खर्च करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

दिनांक १४/०३/२०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार महालक्ष्मी रेसकोर्स येथील एकूण २११ एकर भूखंडापैकी ९१ एकर भूखंडाच्या क्षेत्रफळाच्या भूभागाच्या भाडेपट्टयाचे मे.रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब लि. यांचे नावे नुतनीकरण करण्यास आणि उर्वरित १२० एकर इतक्या भूखंडावर आंतरराष्ट्रीय दर्जाचे सेंट्रल पब्लिक पार्क विकसित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(२) नियोजित सेंट्रल पब्लिक पार्कबाबतचा विस्तृत आराखडा बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून तयार करण्यात येणार आहे.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे आहे.

(५) या अनुषंगाने झोपड्यांचे सर्वेक्षण करुन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाद्वारे पुनर्वसन करण्याकरीता व्यवहारिता तपासणी करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत गट "क" मधील पदांची भरती प्रक्रिया राबविण्याबाबत

**(९) * २३४१३ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय सेवेतील गट "क" वर्गाच्या पदांची भरती प्रक्रिया महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राबविण्याकरीता सेवा प्रवेश नियमात सुधारणा करण्यासाठी सन २०२२ मध्ये निर्णय होऊनही प्रशासकीय पातळीवर त्याची अंमलबजावणी झाली नसल्याने अद्यापही शासकीय भरती प्रक्रिया खाजगी कंपनीमार्फत सुरु असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षक, तलाठी, आरोग्य इ. विविध परिक्षांमध्ये होणाऱ्या पेपरफुटी व गैरव्यवहारांच्या प्रकरणामुळे सदर परीक्षा ह्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्याची मागणी छात्रभारती विद्यार्थी संघटना व विविध विद्यार्थी संघटनांनी केली असून याबाबत कायदा करुन संबंधित दोषींवर कारवाई करण्यासाठी विद्यार्थ्यांनी आंदोलनेही केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू भरती प्रक्रियेत होणाऱ्या गैरव्यवहारांना आळा घालण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत गट "क" वर्गाची भरती करण्याबाबतच्या अंमलबजावणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दिनांक ०२/११/२०२२ अनुसार गट क मधील फक्त लिपिक वर्गीय संवर्गातील पदे महाराष्ट्र सेवा आयोगाच्या कक्षेत आणण्यात आलेली आहेत. लिपिक वर्गीय संवर्गातील प्रथम टप्प्यात लिपिक टंकलेखक ची पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यात येत आहेत. गट-क मधील अन्य पदांच्या पदभरतीसाठी स्पर्धा परीक्षा सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दिनांक २१/११/२०२२ मध्ये नमूद केलेल्या टि.सी.एस.-आयओएन व आय.बी.पी.एस. या खाजगी कंपन्यांमार्फत घेण्यात येत आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

विविध परीक्षा महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्याची मागणी लोकप्रतिनिधींकडून तसेच विविध विद्यार्थी संघटनांनी केली आहे.

(३) गट "क" संवर्गाची भरती महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उत्तन (जि.ठाणे) येथील डंम्पिंग ग्राऊंड हटविण्याबाबत

**(१०) * २३६५४ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या उत्तन (जि.ठाणे) येथील डंम्पिंग ग्राऊंडमध्ये अनेक वर्षांपासून प्रक्रिया न करताच टाकलेल्या कचऱ्याचा ढीग जमा होऊन आगी लागण्याच्या घटनांमध्ये वाढ झाल्यामुळे घातक धुराचे साम्राज्य व दुर्गंधी पसरल्यामुळे सुमारे साठ हजार स्थानिक नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून, मच्छिमारी, शेती व फळबागांचेही नुकसान होत असल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू डंम्पिंग ग्राऊंड लवकरात लवकर हटविण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी केली असून त्यासाठी ते आंदोलन करण्याच्या तयारीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उत्तन येथील डंम्पिंग ग्राऊडमुळे होणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी तसेच डंम्पिंग ग्राऊंड हटविण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

- मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उत्तन येथील डंम्पिंग ग्राऊंडमधील घनकचरा प्रक्रिया प्रकल्पास माहे मार्च, २०२४ मध्ये नैसर्गिकरित्या आग लागली होती.
- सदरची आग तात्काळ विझविण्यात येऊन, भविष्यात अशा प्रकारची आग लागू नये, याकरीता आवश्यक उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत, सदर ठिकाणी राहणाऱ्या नागरिकांची आरोग्य धोक्यात आले, ही बाब वस्तुस्थितीस धरून नाही.

(२) अशा आशयाचे निवेदन स्थानिक नागरिकांकडून महानगरपालिका प्रशासनास प्राप्त झाले, हि वस्तुस्थिती आहे.

(३) मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात दैनंदिन ४५० ते ५०० टन घनकचरा निर्माण होतो. यापैकी उत्तन येथे १२० टन सुका व ३३० टन ओला घनकचऱ्यावर प्रक्रिया करण्यात येत आहे.

- सदर घनकचऱ्यावर प्रक्रिया करून निघणाऱ्या निष्क्रीय कचऱ्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करून सॅनिटरी लँडफिल्ड तयार करण्याचे काम सुध्दा करण्यात येत आहे.

- उत्तन येथील घनकचरा प्रकल्पामध्ये सद्य:स्थितीत शिल्लक असलेल्या घनकचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्याचे काम सुध्दा प्रगतीपथावर आहे.
- सदर घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाच्या ठिकाणी आगीच्या घटना घडू नये, याकरीता प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून महानगरपालिकेमार्फत अग्निशमन दलाच्या वाहनांसह, अधिकारी/कर्मचारी यांची ३ पाळयांमध्ये नेमणूक करण्यात आलेली आहे. तसेच, सदर ठिकाणी जमा असलेल्या घनकचऱ्यावर दैनंदिन पाण्याची फवारणी महानगरपालिकेमार्फत करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून मुंबईतील खाजगी भूखंडावरील वृक्ष छाटणीसाठी गृहनिर्माण सोसायट्यांकडून शुल्क आकारणी केली जात असल्याबाबत

**(११) * २३११९ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खाजगी भूखंडावरील झाड किंवा फांदी अंगावर पडून होणाऱ्या दुर्घटना टाळण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने गृहनिर्माण संस्था (हौसिंग सोसायटी), शासकीय-निमशासकीय संस्था, खाजगी जागा मिळून १८५५ जणांना नोटीस बजाविली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ च्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गृहनिर्माण संस्थांना वृक्ष छाटणीसाठी प्रती झाड ८०० ते ४००० रुपये पर्यंत शुल्क भरावे लागणार असून महानगरपालिका क्षेत्रात २९ लाख ७५ हजार झाडे असून यापैकी १५ लाख ५१ हजार १३२ इतकी झाडे खाजगी भूखंडावर आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशन, २०२३ दरम्यान विधानपरिषद सभागृहात मुंबईतील वृक्ष छाटणीबाबत सोसायट्यांच्या आवारातील झाडांचे संरक्षण करून धोकादायक झाड-फांद्या छाटणीचे काम महानगरपालिकेकडून मोफत केले जाणार असल्याची माहिती मा.नगरविकास मंत्री महोदयांनी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने महानगरपालिकेकडून मोफत झाडांची छाटणी करण्याचे धोरण असतानाही शुल्क आकारणी करण्याची कारणे काय आहेत, मुंबईतील धोकादायक असलेल्या झाड-फाद्यांची महानगरपालिकेकडून मोफत छाटणी करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

पावसाळ्यात वादळी वाऱ्यामुळे अथवा अतिवृष्टीमुळे वृक्ष उन्मळून अथवा फांद्या तुटून कोणतीही दुर्घटना होऊ नये याकरीता खाजगी सरकारी / निमसरकारी जागेतील झाडांची छाटणी माहे एप्रिल, २०२४ अखेर करुन घेण्याकरीता संबंधित संस्थांना नोटीस पाठविण्यात आली आहे.

(२) महानगरपालिका क्षेत्रात खाजगी गृहनिर्माण संस्थेस आवश्यकता असल्यास धोकादायक वृक्ष छाटनीकरीता महानगरपालिकेद्वारे निश्चित शुल्क आकारण्यात येते. वृक्ष गणनेनुसार, बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील २९,७५,२८३ झाडे असून त्यापैकी १५,५१,१३२ इतकी झाडे खाजगी भूखंडावर आहेत.
(३) हे खरे आहे.
(४) खाजगी आवारातील मृत आणि / अथवा धोकादायक वृक्षांच्या फांद्यांची छाटणी करणे, मृत / धोकादायक वृक्ष काढुन टाकणे इत्यादी तातडीची कामे महानगरपालिकेच्या नियुक्त कंत्राटदारांकडुन पार पाडण्यात येत आहेत, जेणेकरून पावसाळ्यात कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवून जिवीत वा वित्त हानी होणार नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत महिला सुरक्षिततेबाबत मोबाईल ॲप बनविण्याबाबत

**(१२) * २३३६७ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने महिला सुरक्षिततेकरीता मोबाईल ॲप बनविण्यासाठी सन २०२४-२०२५ च्या अर्थसंकल्पात रुपये १०० कोटींची तरतूद केली असल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सद्य:स्थितीत महिला सुरक्षाविषयक ॲप उपलब्ध असताना तसेच राज्यातील संकटग्रस्त महिलांना तातडीची मदत उपलब्ध करून देण्याकरीता १००, १०३, १०९० असे तातडीचे दूरध्वनी क्रमांक पोलीस व केंद्रीय यंत्रणेमार्फत उपलब्ध करून देण्यात आलेले असताना बृहन्मुंबई महानगरपालिकेने महिलांच्या सुरक्षिततेकरीता नव्याने ॲप निर्मिती करण्याची व त्याकरीता रुपये १०० कोटी एवढया निधीची तरतूद करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदरहू ॲपच्या निर्मितीवर बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणती कार्यवाही केली तसेच या ॲपच्या माध्यमातून महिलांना कोणत्या सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत,
(४) असल्यास, सदरहू ॲप निर्मितीचे काम कोणत्या कंपनीमार्फत करण्यात येणार आहे अथवा या प्रकरणी ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली वा येणार असल्यास त्याचा सविस्तर तपशील काय आहे,
(५) असल्यास, सदरहू ॲप तयार करण्यात आल्यावर त्यामध्ये नोंदणी करणाऱ्या महिलांची वैयक्तीक व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून गोपनीय असलेली माहिती सुरक्षित ठेवण्याबाबत तसेच त्याचा दुरूपयोग टाळण्याच्या दृष्टीकोनातून बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून कोणत्या उपाययोजना व कार्यपध्दती राबविण्यात येणार असून त्याचा तपशील काय आहे ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सन २०२४-२५ च्या महसुली अर्थसंकल्पात मुंबई महिला सुरक्षा अभियान या लेखाशिर्षामध्ये रुपये १०० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.
(२) महिलांनी सायबर सुविधांचा लाभ घेण्यासाठी अनेक सुरक्षा साधने आणि स्थाने उपलब्ध आहेत. तरीही त्यांच्यात या गोष्टी सुरक्षितपणे कशा वापराव्यात याविषयी जागृतीचा अभाव असल्यामुळे महिला पुरुषांपेक्षा सायबर हल्ल्यांसाठी अधिक प्रमाणात असुरक्षित आहेत.

महिलांना स्वसंरक्षण करण्याकरीता प्रशिक्षण, शासनाच्या विविध योजनांबद्दल प्रचार प्रसिध्दी करणे, डिजीटल सुरक्षा ॲप बनविणे, संकटग्रस्त महिलांकरीता आवश्यक त्या सर्व सुविधा एका छताखाली पुरविणे, महिलांकरीता असणारे कायदे याकरीता जागृती करणे, महिला सुरक्षेच्या अनुषंगाने इतर आवश्यक उपक्रम व उपाययोजना यांकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेने नव्याने ॲप निर्मिती करण्याचे प्रस्ताविले आहे.

(३), (४) व (५) सदर ॲप निर्मितीची कार्यवाही सार्वत्रिक लोकसभा निवडणूक २०२४ च्या आदर्श आचारसंहितेमुळे पूर्ण होऊ शकली नाही. सदर ॲप निर्मितीबाबत संचालक (माहिती तंत्रज्ञान) विभागास पत्राद्वारे मागणी करण्यात आली असून, त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

-----------------

## राज्यातील नद्यांचे प्रदूषण रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(१३) * २३८६२ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रात केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (सीपीसीबी) जल गुणवत्ता व्यवस्थापन विभागाने 'पोल्युटेड रिव्हर स्ट्रेचेस फॉर रिस्टोरेशन ऑफ वॉटर क्वालिटी' हा अहवाल तयार केला असून यामध्ये देशभरातील ६०३ नद्यांचे विश्लेषण करण्यात आले आहे, त्यात सर्वाधिक ५५ प्रदूषित नदीपट्टे महाराष्ट्रात असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील भीमा, मिठी, मुठा, सावित्री, गोदावरी, कन्हान, मुळा, पवना, इंद्रायणी, अंबा, अमरावती, बोरी, बुराई, भातसा, बिंदुसरा, चंद्रभागा, दारणा, घोड, गोमाई, गिरणा, हिवरा, कलू, कन, कोलार, कोयना, कृष्णा, कुंडलिका, मंजिरा, मोर, मोरणा, मूचकुंडी, मोरणा, नीरा, पांझरा, पाताळगंगा, पैनगंगा, पेढी, पेहलर, पूर्णा, रंगावली, सीना, सूर्या, तानसा, तापी, तितूर, उल्हास, उरमोडी, वैतरणा, वशिष्टी, वेण्णा, वाघूर, वैनगंगा, वर्धा, वेणा या नद्यांतील काही भाग प्रदूषित झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदर नद्यांच्या जल प्रदूषणास कारणीभूत घटकांची दखल घेऊन प्रदूषण रोखण्यासाठी प्रशासकीय पातळीवर कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) सांडपाणी जलस्त्रोतांमध्ये सोडण्यात येवू नये याकरीता अमृत, अमृत २.०, नगरोत्थान या योजनांमधून शहरे व गावांमधील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फ़त राज्यातील नदी पट्टयांचे प्रदूषण कमी करण्याकरीता प्रदूषित नद्यांचे कृती आराखडे तयार करून केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे सादर करण्यात आले आहेत. सदर कृती आराखड्यांची अंमलबजावणी विविध विभागांमार्फत करण्यात येत आहे.

- मा.हरित लवादाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे प्रदूषित नदी पट्ट्यांमध्ये प्रदूषण रोखण्याकरीता स्वतंत्र पर्यावरण संनियंत्रण दलाची स्थापना प्रदूषित नदी पट्टे असलेल्या सर्व जिल्ह्यांमध्ये करण्यात आली आहे.
- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीमधून निर्माण होणाऱ्या व विनाप्रक्रिया सोडण्यात येणाऱ्या घरगुती सांडपाण्यामुळे होणाऱ्या जलप्रदूषणाच्या अनुषंगाने संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांविरुध्द महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत जल (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ मधील तरतुदीनुसार वेळोवेळी कारवाई करण्यात येते.
- औद्योगिक कारखान्यांना नदीमध्ये अप्रक्रियाकृत सांडपाणी सोडण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. तसेच, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने तयार केलेल्या अंमलबजावणी धोरणानुसार प्रदूषणकारी उद्योगांवर कारवाई करण्यात येते.
- उद्योगांमधून निर्माण रासायनिक सांडपाण्यामुळे होणाऱ्या जलप्रदूषणाच्या अनुषंगाने संबंधित उद्योगांवर जल (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ मधील तरतुदीनुसार वेळोवेळी कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई शहर व उपनगरात नोकरदार महिला व विद्यार्थ्यांसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेंतर्गत विविध ठिकाणी वसतिगृहे उभारण्याबाबत

**(१४) * २३४८४ श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरात राज्यातील विविध भागांतून व अन्य राज्यातून येणाऱ्या नोकरदार महिला व विद्यार्थ्यांसाठी बृहन्मुंबई महानगरपालिका वसतिगृह उभारणार असून यासाठी विकास आराखड्यात नवीन कलमांतर्गत तरतूद करण्यात येणार असल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू आराखड्यानुसार मुंबईत स्वतःचे घर नसणाऱ्या महिला व विद्यार्थ्यांच्या राहण्याची सोय होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईत कामासाठी येणाऱ्या शेकडो महिला, उच्च शिक्षणासाठी येणारे विद्यार्थी, काहींना नातेवाईक नसल्यामुळे राहण्याची होणारी गैरसोय शिवाय मुंबईत घराचे भाडेही परवडत नसल्यामुळे अनेक महिला, विद्यार्थी मुंबईपासून दूर कर्जत, कसारा, वसई,विरार आदी भागात भाड्याने घर घेऊन राहतात, हे ही खरे आहे काय?

(४) असल्यास, नोकरदार महिला व विद्यार्थ्यांच्या राहण्याच्या सोईसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून लवकरात लवकर वसतिगृहे उभारण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मधील विनियम ३३(२) नुसार आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या विशेष परवानगीने चटई क्षेत्र निर्देशांक ४.०० पर्यंत शैक्षणिक आणि इतर संस्था विषयक इमारतींना तक्ता १२ प्रमाणे सरकारी / महानगरपालिका किंवा सार्वजनिक प्राधिकरण किंवा नोंदणीकृत धर्मादाय विश्वस्त मंडळाच्या स्वतंत्र भूखंडावर देण्यात येतो.

तसेच, खाजगी जमिनीवर विद्यार्थी व कामकाज करणाऱ्या महिलांकरीता (Student / Working women Hostel) खाजगी विकासकाद्वारे सहभाग प्रोत्साहित करण्याकरीता, सध्या अस्तित्वात असलेल्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मधील विनियम ३३ मध्ये विनियम ३३(२५) मध्ये विद्यार्थी / कामकाज करणाऱ्या महिलांकरीता नव्याने समाविष्ट करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ३७ च्या उपकलम (१) नुसार फेरबदल प्रस्तावित करण्यासंदर्भातील कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे करण्यात येत आहे.

(२) व (३) हे खरे आहे.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विकास आराखडा २०३४ नुसार गोरेगांव येथे बहुउद्देशीय कामकाज करणाऱ्या महिलांकरीता वसतिगृह बांधण्यात आले आहे. सदर वसतिगृह १७ मजल्यांचे असून तेथे १७५ बेडची व्यवस्था करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक येथे स्मार्ट सिटी योजनेंतर्गतच्या प्रकल्पांचे काम पूर्ण करण्याबाबत

**(१५)** * **२२९६९ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे स्मार्ट सिटी योजनेंतर्गत सुरू असलेल्या वीस प्रकल्पांपैकी चार प्रकल्पांचे काम अपूर्ण असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक येथील स्मार्ट सिटी प्रकल्पासाठी मंजूर आराखड्यापैकी केवळ ३० टक्के निधी प्राप्त असून, उर्वरित निधी अद्याप प्राप्त झालेला नाही तसेच स्मार्ट सिटी प्रकल्पासाठी स्थापन करण्यात आलेल्या कंपनीची मुदत माहे जून, २०२४ अखेर संपुष्टात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर प्रकल्प अपूर्ण राहण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टीने नाशिक स्मार्ट सिटी प्रकल्पासाठी शंभर टक्के निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

नाशिक स्मार्ट सिटी अंतर्गत एकूण २० प्रकल्प हाती घेण्यात आले होते. त्यापैकी १२ प्रकल्प पूर्ण झालेले असून ८ प्रकल्प प्रगतीपथावर आहेत.

(२) हे खरे नाही.

स्मार्ट सिटी प्रकल्पासाठी मंजूर आराखड्यापैकी ८५.६० टक्के निधी प्राप्त झाला आहे. स्मार्ट सिटी प्रकल्पासाठी स्थापन करण्यात आलेल्या कंपनीची मुदत संपुष्टात येणार नसून केंद्र शासनाच्या दिनांक

०१/०५/२०२३ रोजीच्या पत्रान्वये स्मार्ट सिटी मिशनची मुदत माहे जून, २०२४ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

(३) नाशिक स्मार्ट सिटीची कामे गावठाण हद्दीमधील वर्दळ व मुख्य बाजार पेठेतील आहे व तेथे जुन्या व धोकादायक इमारती व अरुंद रस्ते देखील आहेत. तसेच प्रत्यक्ष काम सुरु झाल्यानंतर लगेचच कोविड-१९ प्रादुर्भाव झाल्यामुळे सन २०२१ मधील कोविडच्या दुसऱ्या लाटेमुळे मनुष्यबळ व साधन सामुग्रीचा अपुरा व अनियमीत पुरवठा इत्यादी कारणांमुळे काही कामे नियोजित वेळेत पूर्ण झालेली नाहीत.

(४) व (५) प्रगतीपथावरील प्रकल्प अंतिम टप्प्यात असून माहे जून, २०२४ अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. शासनाकडून ८५.६० टक्के निधी प्राप्त झाला असून प्रगतीपथावरील प्रकल्प पूर्ण होतील त्यानुसार उर्वरित निधी प्राप्त करुन घेण्यात येईल.

-----------------

## सुरजागड (जि.गडचिरोली) येथील खाणीमध्ये स्थानिकांना रोजगार तसेच बाधित गावांना सोयीसुविधा पुरविल्या जात नसल्याबाबत

**(१६) * २३४७७ श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुरजागड (जि.गडचिरोली) येथील खाणीमध्ये स्थानिकांना रोजगार व बाधित गावांना सोयीसुविधा पुरविल्या जात नसल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खाणीतून लोहखनिजाची वाहतूक अहोरात्र सुरु असल्यामुळे सुरजागड-आष्टी-चंद्रपूर मार्गाची दुरवस्था झाल्यामुळे अपघातात अनेकांना जीव गमवावा लागत असल्याने हिवाळी अधिवेशन, २०२३ मध्ये मा.उपमुख्यमंत्री यांनी याबाबत उपाययोजना करण्याचे आश्वासित करुनही त्रिवेणी अर्थमुव्हर्स प्रा. लि. कंपनीमार्फत लोहखनिज वाहतुकीच्या मार्गावर सुरक्षा गार्ड तैनात करण्याबाबत कोणत्याच उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खाण धारकांवर व लोहखनिज वाहतूक करणाऱ्या त्रिवेणी अर्थमुव्हर्स प्रा. लि. कंपनीवर अद्याप कोणतीही कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, लोहखनिजाची वाहतूक होणाऱ्या रस्त्यावरील अपघात, खाण धारकांकडून नियमांचे पालन न होणे, खाणीमध्ये स्थानिकांना रोजगार उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच खाणीमुळे बाधित होणाऱ्या गावांना सोयीसुविधा पुरविण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

खाणीच्या जवळपासच्या गावांना सोयीसुविधा देण्याच्या उद्देशाने खाणपट्टाधारक कंपनीकडून, खालीलप्रमाणे सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत :-

१. मौजा हेडरी गावात सर्व सोयीसुविधायुक्त ३० खाटांचे व तज्ञ डॉक्टर असलेले रुग्णालय तयार करण्यात आले.

२. मोफत शिक्षण व सीबीएसई पॅटर्न असलेली इयत्ता ५ वी पर्यंतची, मोफत पुस्तके व भोजन सुविधेसह शाळा तयार करुन, त्यात स्थानिकांच्या मुलांना प्राधान्य आहे.

३. परिसरातील गावांमध्ये शुध्द पाणीपुरवठा होण्यासाठी ओव्हरहेड पाण्याच्या टाक्या बसविण्यात आल्या आहेत.

४. स्थानिक अकुशल लोकांना विविध व्यवसायामध्ये कुशल बनविण्यासाठी कंपनीकडून प्रशिक्षण दिले जाते.

५. नावीन्यपूर्ण महिला सक्षमीकरण उपक्रमांतर्गत परिसरातील ४०० महिलांच्या सहभागासह एक गारमेंट युनीट स्थापन करुन दिले आहे.

(२) हे खरे नाही.

या मार्गावर १००० पेक्षा जास्त सुरक्षा गार्ड तैनात आहेत. याशिवाय पोलीस विभागाकडून पुरेशा प्रमाणात ट्राफिक डयुटी अंमलदारांची नियुक्ती करण्यात आली असून, वेळोवेळी नाकाबंदी लावून, खनिज वाहतूक करणाऱ्या वाहनांची तपासणी करण्यात येते.

सध्याच्या रस्त्यावरील भार कमी करण्यासाठी कंपनीने खाणीपासून ते कोनसरी प्लँट पर्यंत भूमिगत स्लरी पाईपलाईन टाकण्याचे काम हाती घेतले असून, ते लवकरच कार्यान्वित करण्याचा प्रयत्न आहे.

(३) हे खरे नाही.

वाहतुकीमुळे झालेल्या अपघातानंतर, पोलीस विभागाकडून सन २०२३ मध्ये एकूण १० तर सन २०२४ मध्ये अद्यापपावेतो ०३ गुन्हे दाखल असून, पुढील कार्यवाही कायद्यातील तरतुदीनुसार सुरु आहे.

(४) सुरजागड येथील खाणीतून ज्या मार्गाने खनिजाची मुख्यत्वे वाहतूक होते अशा मार्गावर अपघात होऊ नयेत यासाठी जनताभिमुख मेळावे घेण्यात येतात. लोकांनी हेल्मेट घालावे व वाहतुकीचे नियम पाळण्याबाबत सूचना देण्यात येतात. तसेच या परिसरातील गावांना सोयीसुविधांबाबत वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

सदर खाणपट्टाधारकाकडून, प्रत्यक्ष खाणक्षेत्रात गडचिरोली जिल्ह्यातील २२८२ स्थानिक तसेच राज्यातील इतर क्षेत्रातील २६७ व्यक्तींना रोजगार उपलब्ध करुन दिले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन आराखड्याच्या सदोष नकाशामुळे रायगड जिल्ह्यातील किनारपट्टीचा नाश होणार असल्याबाबत

**(१७) * २३५५१ श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रवीण दटके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, श्री.गोपिचंद पडळकर, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन आराखड्याच्या सदोष नकाशामुळे रायगड जिल्ह्यातील किनारपट्टीचा नाश होणार असल्याची महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथॉरिटीने माहे मे, २०२३ मध्ये सीआरझेड शिफारशीत नोंद घेतली असून, नवी मुंबईतील पर्यावरणवाद्यांनी केंद्र शासनाकडे याबाबत तक्रार केली असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उरण (जि.रायगड) परिसराचे सीएमझेडपीमुळे विकसनशील क्षेत्रात रूपांतर झाले असल्यामुळे पर्यावरणीय असमतोल होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, समुद्राच्या वाढत्या पाण्याच्या पातळीमुळे किनारपट्टीचा बराचसा भाग पाण्यात जाऊन या झोनवर येणारा कोणताही प्रकल्प कृत्रिमरीत्या समुद्रात भरती रेषा आत जाऊन सुरक्षित राहणार नसल्याची शक्यता नेट कॅटचे संचालक बी. एन. कुमार यांनी वर्तविली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या कास्टिंग यार्ड मधील दहा एकराचा भूखंड आता तिरुपती बालाजी मंदिरासाठी देण्यात आल्याने सदर प्रकरण पर्यावरणवाद्यांनी राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणासमोर सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रायगड जिल्ह्यातील सागरी किनारपट्टीवरील सुरक्षितता कायम राखण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) श्री.बी.एन.कुमार यांनी केंद्र शासनाकडे दिनांक १६/०२/ २०२४ रोजी दाखल केलेल्या तक्रारीमध्ये सदर बाबत उल्लेख केलेला दिसून येतो.
(४) होय, हे खरे आहे.

श्री.बी.एन. कुमार यांनी राष्ट्रीय हरित लवाद पुणे यांचेकडे अपिल क्र.१३/२०२४ (Banda Nagaraj Kumar versus CIDCO and Ors) दाखल केले असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(५) रायगड जिल्ह्यात पोलीस विभागाकडून नियमितपणे सागरी किनारा भागात वाहन गस्त, पायी गस्त व पेट्रोलिंग करण्यात येते.सागरी सुरक्षिततेकरीता जास्तीत जास्त सागर रक्षक दलाच्या बैठका घेवुन त्यामध्ये मच्छिमारांच्या सतत संपर्कात राहुन त्यांना सतर्कबाबत पोलीस अधीक्षक कार्यालय रायगड मार्फत सुचना देण्यात येतात. तसेच जेटी व लॅन्डींग पॉईट या ठिकाणी दिवस रात्र कार्यरत राहतील असे उच्च क्षमतेचे सीसीटीव्ही कॅमरे बसविण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## थळ (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील खतनिर्मिती करणाऱ्या आरसीएफ कंपनीकडून दूषित पाणी खाडीत सोडण्यात येत असल्याबाबत

**(१८)** * **२३२३९ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) थळ (ता.अलिबाग, जि.रायगड) येथे अनेक वर्षांपासून खतनिर्मिती करणारी आरसीएफ कंपनी असून या कंपनीचे दूषित पाणी खाडीत सोडले जात असल्यामुळे अनेक मासे मृत पावल्याच्या घटना वारंवार होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्थानिक मच्छीमारांचे मोठ्या प्रमाणात होत असलेले नुकसान टाळण्याच्या दृष्टीने सदर दोषी कंपनीविरोधात कोळी बांधवांनी प्रदूषण महामंडळाकडे गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोळी बांधवांनी केलेल्या तक्रारीचे निवारण करण्याच्या दृष्टीने सदर प्रकरणी कंपनीतील दोषींविरुध्द महाराष्ट्र प्रदूषण महामंडळाकडून कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) प्रश्नाधिन विषयाबाबतचे निवेदन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाले होते.
(२) व (३) सदर निवेदनाच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत दिनांक ०६/०३/२०२४ व दिनांक २१/०३/२०२४ रोजी करण्यात आलेल्या पाहणीदरम्यान आढ़ळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने आरसीएफ उद्योगास दिनांक २९/०५/२०२४ रोजी प्रस्तावित निर्देश बजावण्यात आले असून पुढ़ील कारवाई महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## खालापूर (जि.रायगड) येथील ढेकू औद्योगिक वसाहतीतील सांडपाण्यामुळे पाताळगंगा नदीपात्रातील जलप्रदूषणात वाढ झाल्याबाबत

**(१९)** * **२३१७० श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खालापूर (जि.रायगड) येथील ढेकू औद्योगिक वसाहतीमध्ये असणाऱ्या कामानी ऑईल आणि इतर कंपन्यांनी सांडपाणी थेट पाताळगंगा नदीत सोडल्याने नदीपात्राच्या किनारी गावातील विहीरीचे पाणी दूषित झाल्याचे तसेच जलचर नष्ट होत असल्याची बाब दिनांक १४ जानेवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाल्यातील जलचर पूर्ण नष्ट झाले असून वायू प्रदूषणाने परिसरातील रहिवाशांना संसर्गजन्य आजाराची लागण झाली असल्याने स्थानिक रहिवाशांनी खालापूर विभागातील प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दिनांक १४ जानेवारी, २०२४ रोजी तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) प्रश्नाधीन विषयाबाबतची तक्रार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झाली होती.
(३) सदर तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत प्रश्नाधिन परिसराच्या दिनांक २९/०१/२०२४ रोजी केलेल्या पाहणीदरम्यान उद्योगातील सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा सुव्यवस्थित असल्याचे तसेच उद्योग परिसरातील कोणताही नाला बुजवण्यात आला नसल्याचे निदर्शनास आले होते.

- सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय, रायगड यांचेकडून प्राप्त अहवालानुसार कोणतीही तक्रार सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय, रायगड यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेली नाही.

- जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद रायगड यांच्या प्राप्त अहवालानुसार साथीच्या रोगाचा उद्रेक आढळून आलेला नाही.

(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## नवी मुंबईमधील सिडको प्रकल्पात शेतकऱ्यांना आरक्षण देण्याबाबत

**(२०) * २३३३९ श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई येथे ज्या शेतकऱ्यांच्या जमिनीवर सिडको मोठे प्रकल्प उभारत आहे त्या शेतकऱ्यांना सिडकोच्या प्रकल्पामध्ये आरक्षण दिले जात नसल्याचे तसेच उलवे येथील दुकानांच्या लिलाव प्रक्रियेत प्रकल्पग्रस्तांसाठी आरक्षण न ठेवल्याने प्रकल्पग्रस्तांवर अन्याय झाल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिडकोच्या या निर्णयाला स्थानिक भूमिपुत्रांकडून विरोध करण्यात येत असल्याने त्यांनी आंदोलन करण्याचा इशारा सिडकोला दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सिडकोची स्थापना झाल्यापासून गत ५१ वर्षांमध्ये हे सर्व भूमिपुत्र आपल्या न्याय मागण्यांसाठी सातत्याने संघर्ष करीत असून सर्व भूमिपुत्रांच्या जमिनी विविध प्रकल्पांसाठी अत्यंत कमी दराने संपादन करून त्या विकत आहेत, असा आरोपही नवी मुंबई उरण पनवेलमधील भूमिपुत्र करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नवी मुंबई मधील विविध परिसराचा विकास व्हावा, येथील नागरिकांचे जीवनमान उंचावे, येथील परिसर औद्योगिकदृष्ट्या विकसित व्हावे या दृष्टीकोनातून शासनाने नवी मुंबई परिसरासाठी १७ मार्च १९७० रोजी सिडको महामंडळची स्थापना केली मात्र सिडकोनेच येथील स्थानिक भूमीपुत्रांवर नेहमी अन्याय केल्याने रायगड जिल्ह्यातील तसेच नवी मुंबई परिसरातील बेरोजगार प्रकल्पग्रस्त, स्थानिक भूमिपुत्रांचे प्रश्न अजूनही प्रलंबित असून त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) नवी मुंबई प्रकल्पासाठी सिडको महामंडळाची "विशेष नियोजन प्राधिकरण" व "नवनगरविकास प्राधिकरण" म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सदर प्रकल्पासाठी शेतकऱ्यांच्या संपादित जमिनीच्या बदल्यात शासन निर्णय दिनांक ६/०३/१९९० व दिनांक २८/१०/१९९४ अन्वये १२.५% योजनेंतर्गत विकसित भूखंडांचे वाटप संबंधित भूधारकांना करण्यात येते. तसेच, शासन निर्णय दिनांक २८/०२/२०१८ अन्वये संपादित जमिनीच्या बदल्यात २२.५% विकसित भूखंड वाटप करण्यात येतात. सिडको महामंडळासाठी बांधण्यात येणाऱ्या गृहनिर्माण योजनेतील सदनिकांच्या सोडतीमध्ये प्रकल्पग्रस्तांसाठी ५% सदनिका राखीव ठेवण्यात येतात. गृहनिर्माण प्रकल्पात गाळे / दुकाने निविदा ई-लिलाव (Tender cum E auction) द्वारे विक्री करण्यात येतात. त्यामध्ये वैधानिक घटकांसाठी (Statutory Category) म्हणजेच SC, ST, NT & DT आणि दिव्यांग संवर्गासाठी आरक्षण ठेवण्यात येते.

यांव्यतिरिक्त १२.५% योजनेंतर्गत वाटप केलेल्या भूखंडांच्या अनुज्ञेय चटई क्षेत्रासाठी १५% चटई क्षेत्राचा वापर वाणिज्यिक (Commercial) वापर अनुज्ञेय करण्यात आलेला आहे. तसेच सिडको महामंडळाच्या आस्थापनेवर कायमस्वरुपी / कंत्राटपध्दतीने प्रकल्पग्रस्तांच्या भरतीस प्राधान्य देण्यात येते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## नागपूर येथील झिरो माईल येथे अत्याधुनिक कॉम्प्लेक्स उभारण्याच्या योजनेबाबत

**(२१) * २३६९४ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील झिरो माईल येथे मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनच्या वतीने व तसेच नासुप्र व मनपाच्या सहाय्याने २० मजली अत्याधुनिक कॉम्प्लेक्स उभारण्याची योजना तयार करण्यात आली असून फ्रिडमपार्क असे या प्रकल्पाचे नाव असून केंद्रीय पर्यावरण विभागाने ७९.८१ मीटर उंच बांधकामासाठी या इमारतीला मंजुरी दिली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कॉम्प्लेक्समध्ये हॉटेल, सभागृह, लॉन्ज, मॉल, थिएटर, फ्रुटकिट, ब्रॅन्डेड शोरूम इत्यादी सुविधायुक्त इमारतीच्या प्रकल्पाकरीता सार्वजनिक खाजगी सहभाग (PPP) या तत्वावर २/९०/००० फुट बांधकाम करण्याकरीता टेंडर प्रक्रिया करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) नागपूर येथील झिरो माईल येथे मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनच्यावतीने व तसेच नासुप्र व मनपाच्या सहाय्याने २० मजली अत्याधुनिक कॉम्प्लेक्स उभारण्याची योजना तयार करण्यात आलेली नाही. तथापि, देशातील झिरो माईल लगत महामेट्रोला शासनामार्फत प्राप्त झालेल्या जमिनीवर २० मजली मेट्रो स्टेशनच्या (वाणिजिक वापरासह) संकल्पना योजलेली (Concept Plan) आहे. यावरील मजल्याचे बांधकाम हे सार्वजनिक खाजगी सहभाग (PPP) या तत्वावर करण्याचे ठरले आहे. झिरोमाईल प्रकल्पाकरीता भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाने ९०.१८ मिटर उंच बांधकामासाठी मान्यता दिली आहे.
(२), (३) व (४) महामेट्रोतर्फे २०२१ पासून ३ वेळा निविदा बोलविण्यात आल्या असून वेळोवेळी मुदतवाढ देवूनही या निविदांना प्रतिसाद मिळालेला नाही. त्यामुळे या ठिकाणी संकल्पना योजनेनुसार बांधकाम सुरु झालेले नाही. महामेट्रोमार्फत वेळोवेळा निविदा काढून हा प्रकल्प सार्वजनिक खाजगी सहभाग (PPP) या तत्वावर कार्यान्वित व्हावा, याबाबत प्रयत्न करण्यात येत आहे.

----------------

## मीरा-भाईंदर महानगरपालिकेची रुग्णालयाच्या बांधकामाकरीता विकासकाने फसवणूक केल्याबाबत

**(२२) * २३९७८ श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मिरा रोड येथील रुग्णालयाच्या आरक्षित जागेत टीडीआरच्या माध्यमातून बांधावयाच्या मल्टीस्पेशालिटी रुग्णालयाचे भूमिपूजन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बांधकामाकरीता महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या विकासकाने रुग्णालयाचे बांधकाम सुरु न करता स्वत:च्या इमारतीचे बांधकाम पूर्ण करून त्यातील फ्लॅट विकण्यास सुरुवात केली असल्याची बाब माहे मार्च, २०२४ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर विकासकाने महानगरपालिकेसह ग्राहकांच्याही केलेल्या फसवणुकीसंदर्भात गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय, तसेच शासनाने सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्या विकासकावर व संबंधित दोषींवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) मिरा-भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेमधील मौजे नवघर येथील आरक्षण क्रमांक ३०२ "हॉस्पिटल" या आरक्षणामध्ये समावेशक आरक्षणांतर्गत विकासक/जमिनमालक यांना दिनांक ०७/१०/२०२२ रोजी हॉस्पीटल बांधकामासाठी महानगरपालिकेने परवानगी दिली असून, सदर परवानगीच्या अनुषंगाने भूमिपुजन करण्यात आले, हि वस्तुस्थिती आहे.
(२) हॉस्पिटल करीता विकास परवानगी अदा केल्यानंतर विकासक यांना समावेशक आरक्षणाच्या तरतुदीनुसार त्यांच्या मालकीच्या बाधित जमिनीपैकी अनुज्ञेय क्षेत्रावर रहिवास व वाणिज्य वापरासाठी दिनांक १७/०४/२०२३ रोजी विकास परवानगी दिलेली आहे.

- उक्त विकास परवानगीमधील अटी व शर्तीची पूर्तता न केल्याने दिलेल्या परवानगीस महानगरपालिकेने दिनांक २१/०६/२०२३ रोजी स्थगिती दिली आहे.
- दिलेल्या दोन्ही परवानगीच्या अनुषंगाने विकासक यांनी जागेवर इमारतीचे बांधकाम सुरु केलेले नाही. तथापि, महानगरपालिकेने दिलेल्या बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने इमारतीमधील सदनिकांचे, खरेदीचे करारनामे, सह दुय्यम निबंधक कार्यालयात नोंद झाले असल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) विकासकास रहिवास व वाणिज्य वापरासाठी दिलेल्या विकास परवानगीस महानगरपालिकेने स्थगिती दिलेली आहे. तथापि, सदर स्थगिती आदेशाविरुध्द विकासकाने मा.उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली असून सदर प्रकरण सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या भायखळा येथील वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान आणि प्राणी संग्रहालयात प्राण्यांचे मृत्यू झाल्याबाबत

**(२३) * २३११३ श्री.प्रसाद लाड, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भायखळा (मुंबई) येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान आणि प्राणी संग्रहालयात (राणीची बाग) गत एका वर्षात ४७ प्राण्यांचा मृत्यू झाला असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्राणी-पक्ष्यांच्या नियमित हृदय, फुफ्फुस, मेंदू, किडनी, यकृत इत्यादी अवयवांची तपासणी होत असतानाही प्राण्यांचे अवयव निकामी होऊन मृत्यू होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने या प्राणी-पक्ष्यांच्या देखभालीमध्ये दिरंगाई करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली तसेच प्राणी-पक्षांचे मृत्यू रोखण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे. भायखळा येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 'वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान आणि प्राणी संग्रहालयात' (राणीची बाग) येथे माहे एप्रिल, २०२३ ते एप्रिल, २०२४ या कालावधीत २८ प्राणी-पक्ष्यांचे वृध्दापकाळाने मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) हे खरे नाही.

सदर प्राणी संग्रहालयातील प्राण्यांना त्यांच्या विहित खाद्य तक्त्यानुसार नियमित योग्य सकस आहार पुरविला जात असून, त्यांच्या आरोग्यविषयक देखभालीकरीता तेथे पूर्णवेळ पशुवैद्यकीय डॉक्टर नेमण्यात आले आहेत.

केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्याकडील मानकांनुसार प्राणी संग्रहालयातील सर्व वन्यप्राणी-पक्ष्यांच्या आरोग्याची नियमित तपासणी, लसीकरण, औषधोपचार, निर्जंतुकीकरण, उपचार, नियमित आहार इत्यादी बाबींची सदर प्राणी संग्रहालयातील पशुवैद्यकांमार्फत वेळोवेळी पूर्तता करण्यात येते. प्राणी-पक्ष्यांच्या देखभालीमध्ये सदर प्राणी संग्रहालय यंत्रणेकडून कोणत्याही प्रकारचे दुर्लक्ष झालेले नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रात बोगस अकृषक नोंदी होत असल्याबाबत

**(२४)** * **२३८९८ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांतर्गत ३१३ गावे समाविष्ट असून उक्त परिक्षेत्रातील ग्रीन झोन मधील जमिनी अवैधपणे यलो झोनमध्ये रुपांतरीत करुन बनावट अकृषक परवाने तयार केले असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीत कोणत्याही बांधकामासाठी प्राधिकरणाकडून अकृषक परवाना व रेखांकनाची मंजूरी घेणे आवश्यक असून तद्नंतर जमिनीची दस्त नोंदणी करण्यात येते, परंतु सदरहू प्रक्रियेकडे दुर्लक्ष करुन मुद्रांक, महसूल, महाराष्ट्र प्रादेशिक प्राधिकरण विभागातील कर्मचारी यांचेशी आर्थिक संगनमत करुन बनावट अकृषक परवाने तसेच रेखांकन तयार केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू दस्तांची नोंदणी रजिस्ट्री कार्यालयात झाल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रात बनावट अकृषक नोंदी प्रकरणी दोषी विरुध्द गुन्हा दाखल करुन संबंधित विभागाच्या अधिकारी व कर्मचारी यांना निलंबित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांतर्गत ३१३ गावांच्या परिक्षेत्रात काही प्रकरणांमध्ये ग्रीन झोन मधील जमिनी यलो झोन मध्ये रुपांतरीत न करता निवासी वापराकरीता अकृषक आदेश/सनद देण्यात आल्याचे तसेच एका प्रकरणात बनावट अकृषक आदेश/सनद तयार झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) उक्त भाग (१) मध्ये नमुद केल्याप्रमाणे एका प्रकरणात बनावट अकृषक आदेश/सनद तयार झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) विभागीय आयुक्त तथा महानगर आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी मुद्रांक जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांना दिनांक १५/०८/२०१९ पासून भुखंडाचे नोंदणीकृत दस्ताऐजांची कायदेशीर सत्यता तपासावी व त्याबाबतचा सविस्तर अहवाल नोंदणीकृत दस्ताऐवजांच्या प्रतीसह सादर करणेबाबत निर्देश दिले आहेत. त्यानुषंगाने तपासणी पथक गठीत करण्यात आले आहे.
(४) विभागीय आयुक्त तथा महानगर आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांना सदर प्रकरणी सविस्तर तपासणी करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपली चिकित्सा योजनेंतर्गत क्रस्ना डायग्नोस्टीक सेंटरची थकीत रक्कम अदा करण्याबाबत

**(२५)** * **२३६१२ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपली चिकित्सा योजनेंतर्गत (आपला दवाखाना) रुग्णांच्या विविध चाचण्या करणाऱ्या मे.क्रस्ना डायग्नोस्टीक सेंटरची मागील १० महिन्यांमध्ये १० कोटी रुपयांहून अधिक रकमेची थकबाकी महानगरपालिकेकडे असल्याने सदर योजना बंद पडण्याची शक्यता निर्माण झाल्याचे नुकतेच माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, थकीत रक्कम मिळण्याबाबत महानगरपालिकेच्या मध्यवर्ती खरेदी खात्याला अनेक स्मरणपत्रे पाठवूनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने थकीत रक्कम तात्काळ देण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागात मे. क्रस्ना डायग्नोस्टीक हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपली चिकित्सा सुरळीत सुरु आहे.

तसेच, मे. क्रस्ना डायग्नोस्टीक यांनी माहे मार्च, २०२४ पर्यंत सादर केलेले देयकांचे अधिदान त्यांना करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लातूर महानगरपालिकेच्या शाळांकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२६) * २३०५४ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर शहरात महानगरपालिका प्रशासनाच्या २६ प्राथमिक शाळा असून शाळांमध्ये गोर-गरीब मजुर, कामगार यांची मुले/मुली शिक्षण घेत असून शाळांना चांगल्या इमारती, मैदान याशिवाय कोणत्याच भौतिक सोयी-सुविधा उपलब्ध करुन दिल्या जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळांना भौतिक सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी व शाळा दुरुस्ती करण्यासाठी लातूर महानगरपालिकेने दिनांक १५ मार्च, २०२३ रोजीच्या पत्रान्वये शासनाकडे रुपये ३९२.२० लक्ष निधी मिळणेसाठी प्रस्ताव दिला असून अद्याप त्यासंदर्भात कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन लातूर महानगरपालिकेने सादर केलेल्या मागणीनुसार निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) जिल्हाधिकारी, लातूर यांच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने शाळेचे नुतनीकरण व स्कूल डिजीटलाईझेशन करणे या कामाकरीता रुपये २९२.०० लक्ष निधी शासन शुध्दीपत्रक क्रमांक पुरक-२०१८/ प्र.क्र.९८(०५)/नवि-१६ (ई-६४०८८६) दिनांक ११ जुन, २०२४ अन्वये मंजूर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी महानगरपालिकेने उपाययोजना करण्याबाबत

**(२७) * २३२९२ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने जाहीर केलेल्या माहितीनुसार मुंबईत सन २०१९ ते २०२३ या कालावधीमध्ये शून्य ते पाच या वयोगटातील सुमारे ९ हजार, ९६१ मुलांचा मृत्यू झाला असून, १० ते १८ या वयोगटातील सुमारे ५ हजार, ३०१ मुलांचा मृत्यू झाला असून मृत्यू पावणाऱ्या मुलांची संख्या वाढत असल्याची बाब दिनांक १ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मातेचे कुपोषण, गर्भामधील व्यंग व मुदतपूर्व प्रसूती तसेच असंसर्गजन्य आजारांमुळे होणाऱ्या बालमृत्यूचे प्रमाण जास्त असून बालरोग तज्ञांच्या सल्ल्यानुसार हृदयविकार, अनुवंशिक आजार व मुदतपूर्व जन्म याही कारणांचा समावेश असून याबाबत शासनाने चौकशी करुन बालमृत्यू टाळण्यासाठी कोणत्या प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी मुंबईत ० ते ५ आणि १० ते १८ या वयोगटांमधील एकूण १५ हजार २६२ एवढे बालमृत्यू झाले असून, सदर बालकांचे मृत्यू रोखण्याबाबत शासनाने कोणत्या ठोस उपाययोजना हाती घेतल्या आहेत वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात सन २०१९ ते २०२३ या कालावाधीमध्ये शून्य ते पाच या वयोगटातील सुमारे ९,५९३ मुलांचा मृत्यू झाला असून, १० ते १८ वयोगटातील सुमारे ५,०५० मुलांचा मृत्यू झाला आहे. तथापि, बालकांच्या मृत्यूच्या संख्येत लक्षणीय वाढ झालेली नाही.
(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कुपोषित माता व कमी वजनाच्या बालकांच्या नियंत्रणासाठी प्रसुतीगृहांमध्ये प्रसुती पुर्व तपासणी, प्रसुती व प्रसुती पश्चात तपासणी यांवर अधिक भर देण्यात येत आहे. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत राज्य शासनाच्या जननी सुरक्षा योजना, जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम इ. योजना राबविण्यात येत आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेंतर्गत जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम मार्गदर्शक तत्वांनुसार सोनोग्राफी, रक्त आणि मूत्र परीक्षा, पॅप स्मीअर, औषधे, सिझेरियन ऑपरेशनसह ऑपरेशन थिएटर सेवा, कुटुंब नियोजन सेवा इ. प्रसुतीपूर्व व प्रसुतीपश्चात सेवा मोफत प्रदान केल्या जात आहेत. तसेच संस्थात्मक प्रसुतीला प्रोत्साहन देणे, प्रसुतीनंतरची काळजी, स्तनपान इत्यादींचा समावेश आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून मुंबईकरांना सुरळीत पाणीपुरवठा करण्याबाबत

**(२८)** * **२२९६४ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने मुंबईतील पाणीचोरी आणि पाणीगळती कमी झाली असल्याचा दावा कित्येक वेळा केला असूनही मुंबईतील झोपडपट्टी भागात पाणी गळतीचे आणि चोरीचे प्रमाण खुप जास्त असल्याची बाब दिनांक १ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या मोठ्या जलवाहिन्यांच्या गळतीतून लाखो लीटर पाणी आजही वाया जात असल्याने 'मागेल त्याला पाणी' आणि सर्वांसाठी पाणी धोरण आखणे बृहन्मुंबई महानगरपालिकेस शक्य होत नसून मुंबईतील कित्येक नागरिकांना पाण्याची उपलब्धता होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेने पाणी वापरात किंवा बचतीसाठी काटकसरीचे नियोजन करुन नादुरुस्त व्हॉल्व्ह किंवा जीर्ण झालेल्या जलवाहिन्या दुरुस्त करण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून मुंबईकरांना सुरळीत पाणीपुरवठा होण्यासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील मुख्यत: झोपडपट्टी भागात काही प्रमाणात अनधिकृत जलजोडण्या आढळून येतात. तथापि, अशा अनधिकृत जलजोडण्यांवर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नियमितपणे कारवाई केली जाते.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्व रहिवाशांना "सर्वांसाठी पाणी" हे धोरण दिनांक ०१/०५/२०२२ पासून राबविण्यात येत असून सदर धोरणांतर्गत माहे मार्च, २०२४ अखेर ५००० अर्जदारांना जलजोडण्या देण्यात आल्या आहेत.
(३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेचे एकंदरीत संपूर्ण जलवाहिन्यांचे जाळे जुने असल्याने आवश्यकतेनुसार आवश्यक त्याठिकाणी जलवाहिन्या बदलण्याचेही काम नियमितपणे सुरु असते. बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात पाणी पुरवठ्यामध्ये होत असलेली गळती व पाणीचोरी नियंत्रित करण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेमार्फत विविध उपाययोजना करण्यात येतात.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बोरीवली (मुंबई) येथील स्वातंत्र्यवीर सावरकर उद्यानात गुजराती भाषेतील नामफलक लावण्यात आल्याबाबत

**(२९) * २३६३३ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोरीवली (मुंबई) येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्वातंत्र्यवीर सावरकर उद्यानाच्या दर्शनी भागात गुजराती भाषेत नामफलक लावण्यात आला असल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बोरिवली, कांदिवली व मालाड (मुंबई) परिसरात गेली अनेक वर्षे गुजरातीचा अतिवापर केला जात असून अनेक रस्त्यांची नावे, रेल्वे स्थानकांवरील सूचना, खाण्यापिण्याच्या वस्तूंवर हेतुपुरस्सरपणे गुजरातीला प्राधान्य दिले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्थानिकांच्या विरोधानंतर गुजराती नामफलक दोन दिवसांत हटविण्याचे आदेश बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिले असून यासंदर्भात उद्यान देखभालीची जबाबदारी दिलेल्या संस्थेला नोटीस बजावली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गुजराती नामफलक हटवून तेथे मराठी नामफलक लावण्यासह या भागातील दुकाने, रस्त्यांची नावे इ. पहाणी करुन तेथे मराठी नामफलक लावण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) सदर उद्यानास ३ प्रवेशद्वार आहेत. त्यापैकी प्रवेशद्वार क्र.३ च्या मधोमध मराठी भाषेत स्वातंत्र्यवीर सावरकर उद्यान असा मोठ्या अक्षरात नामफलक आहे. तसेच, सदर नामफलकाच्या डाव्या बाजूस लहान अक्षरात गुजराती भाषेतील व उजव्या बाजूस लहान अक्षरात इंग्रजी भाषेतील नामफलक आहे.
(२) शासन परिपत्रक मराठी भाषा विभाग दिनांक ०५ डिसेंबर, २०१७ अन्वये विहित केल्याप्रमाणे केंद्र सरकारच्या त्रिभाषा सुत्रानुसार इंग्रजी व हिंदी बरोबरच प्रादेशिक भाषेचा म्हणजे मराठी भाषेचा वापर करणे बंधनकारक आहे. त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बोरिवली (आर/मध्य), कांदिवली (आर/दक्षिण), मालाड (पी/उत्तर) विभागांमार्फत लावण्यात येणारे रस्ते नामफलक, सूचना फलक इ. मराठी, हिन्दी व इंग्रजी याच भाषांमध्ये लावण्यात येतात. त्यामुळे सदर विभाग कार्यालयांत गुजराती भाषेचा हेतुपुरस्सर अतिवापर झाल्याची बाब बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निदर्शनास आलेली नाही.
(३) बोरिवली, मुंबई येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीचे असलेल्या व मे.पोईसर जिमखाना या खाजगी संस्थेस दत्तक तत्वावर देखभालीकरीता देण्यात आलेल्या स्वातंत्र्यवीर सावरकर उद्यानाच्या प्रवेशद्वारावरील नामफलक हे गुजराती भाषेमध्ये लिहल्याची तक्रार विविध माध्यमातून मोठ्या प्रमाणात बृहन्मुंबई महानगरपालिकेला प्राप्त झाल्या. त्यामुळे सदर ठिकाणी असलेले गुजराती भाषेतील नामफलक काढून मराठी भाषेमध्ये त्वरीत करुन त्याबाबतचा अहवाल सादर करण्यास बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक ०४/०४/२०२४ च्या पत्रान्वये मे.पोईसर जिमखाना या संस्थेस कळविले आहे.
(४) मा.उच्च न्यायालयाकडून रिट याचिका क्र.२७०३/२०२३ मध्ये प्राप्त झालेल्या निर्णय व कायदा अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या अभिप्रायासापेक्ष मराठी भाषेपेक्षा लहान अक्षरे असलेला गुजराती व इंग्रजी भाषेतील नामफलक काढण्यात आलेला नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दुकाने व आस्थापना विभागातील सुविधाकारांनी बोरीवली, कांदिवली व मालाड भागातील मराठी नामफलक लावण्याच्या संदर्भातील तपासणीकरीता दिनांक २८/११/२०२३ ते दिनांक २४/०५/२०२४ पर्यंत ९५११ दुकानांना भेटी दिल्या असून महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम, २०१७ मधील मराठी नामफलकाच्या तरतुदीबाबत भंग केल्याचे आढळलेल्या ३८३ दुकानांवर बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे न्यायालयीन कारवाई करण्यात आली. त्यानुसार सदर कार्यवाहीमध्ये एकूण ३६० न्यायालयीन खटले दाखल केले असून त्यापैकी १९५ खटले निकाली निघाले व रुपये ६,३९,०००/- दंड करण्यात आला आहे. १५ प्रकरणांमध्ये प्रशमनाद्वारे रुपये ६६०००/- प्रशमन दंड करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील कोळीवाड्यांचे अस्तित्व आणि वैशिष्ट्य जपण्यासाठी स्वतंत्र विकास नियमावलीचे धोरण आखण्याबाबत

**(३०) * २३१२९ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.राजहंस सिंह, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रसाद लाड, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगर परिसरातील विशेषत: कुलाबा, वर्सोवा परिसरातील जुन्या चाळी, इमारती आणि कोळीवाड्यांचा पुनर्विकास पुरातन वारसा वास्तू यादीतील इमारती इत्यादी कोळीवाड्यांतील रहिवाशांच्या समस्या गेली अनेक वर्षे प्रलंबित असून त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ च्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोळीवाडे ही मुंबईची ओळख असली तरी काही भागात मासेमारीसाठी चांगली जेट्टी नसल्यामुळे मच्छीमारांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे तसेच मुंबईतील कोळीवाड्यांमध्ये अनेक वर्षांपासून पिढ्यानपिढ्या राहणाऱ्या मच्छीमार कुटुंबियांची संख्या वाढल्यामुळे कोळीवाड्यांचा विस्तार करण्याची गरज असताना त्यांना नवीन घरे बांधण्यासाठी परवानगी दिली जात नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मढ ते वर्सोवा या दोन समुद्रकिनाऱ्यांना जोडण्यासाठी पुल उभारणे, मासेमारी करून आलेल्या बोटीने मासे उतरविण्यासाठी चांगली जेट्टी व अन्य सोयी सुविधा उपलब्ध करणे, समुद्रालगतच्या दिव्यामुळे मासेमारीसाठी खोल समुद्रात जाण्याकरीता अतिरिक्त डिझेल लागते ते देऊन डिझेलचे परतावे वेळेवर देणे, कोळीवाड्यांमध्ये नवीन घरे बांधण्याची परवानगी देणे आदी मागण्या प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कुलाबा परिसरातील ससून गोदीमध्ये मासेमारी करणारे आणि मासळी विक्री करुन हजारो कुटुंबाचा उदरनिर्वाह चालत असून त्यांना मासेमारी बोटी व चांगल्या सुविधा देऊन मासळीचा व्यवसाय करणाऱ्यांच्या सोयींसह या गोदीचा विकास करण्याकडे प्रशासनाचे पूर्णपणे दुर्लक्ष झालेले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मुंबईतील कोळीवाड्यांचे अस्तित्व आणि त्यांचे वैशिष्ट्य जपण्यासाठी स्वतंत्र विकास नियंत्रण नियमावली तयार करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्यास, सदरहू प्रस्तावचे थोडक्यात स्वरूप व सद्य:स्थिती काय आहे,

(६) असल्यास, मुंबईतील सर्वच कोळीवाड्यांचे प्रश्न सारख्याच स्वरुपाचे असून त्याकरीता धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज पाहता कोळीवाड्यांचे अस्तित्व आणि त्यांचे वैशिष्ट्य जपण्यासाठी स्वतंत्र विकास नियंत्रण नियमावलीचे धोरण आखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ चे विनियम ३३(१६) मध्ये गावठाण/कोळीवाडा/आदिवासी पाडा यांचे पुनर्विकास संबंधी तरतुद करण्यात आली आहे. त्यातील उपखंड (a) व (b) मध्ये गावठाण/कोळीवाडा/आदिवासी पाडा यांचेमधील मालमत्तांचे पुनर्विकासाकरीता

तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे सदरहू तरतुदीनुसार कोळीवाड्यांमधील बांधकामांचा पुनर्विकास शक्य आहे.

कोळीवाड्याला पुनर्विकास पुरातन वारसा यादीतील इमारतींच्या पुनर्विकासासंदर्भित प्रचलित नियमावली व धोरणानुसार पुनर्विकासाची परवानगी दिली जाते.

याव्यतिरिक्त, विनियम ३३(१६) चे उपखंड (d) मध्ये गावठाण/कोळीवाडा/आदिवासी पाडा यांचे विकासाकरीता स्वतंत्र नियमावलीची तरतुद प्रस्तावित करण्यात आली आहे. तथापि, सदर उपखंड (d) ची तरतुद प्रलंबित (Abeyance) ठेवण्यात आली आहे.

गावठाण/कोळीवाडा/आदिवासी पाडा चे पुनर्विकासासंबंधी नियमावली शासन नगरविकास विभागाचे स्तरावर छाननी करण्यात येत असून त्यानुसार प्रस्ताव विचाराधीन आहे.

(२) हे खरे नाही, मुंबईमधील मच्छिमार सहकारी संस्थांनी मागणी केल्यानुसार नौका नांगरण्यास आवश्यक सुविधा, तसेच मच्छिमार जेट्टी बांधण्याची कामे, मत्स्यव्यवसाय विभागाकडून करण्यात येतात. तसेच कोळीवाड्यातील मच्छीमार कुटुंबियांना नवीन घरे बांधण्यासाठी विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ च्या विनियम ३३(१६)(अ)(ब) व (क) मध्ये तरतुद आहे व त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे विकास परवानगीसंबंधीची कार्यवाही केली जाते.

(३) हे खरे नाही, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रमुख अभियंता (पूल) विभागातर्फे मढ ते वर्सोवा दरम्यानचे पूलाकरीता महा टेंडर पोर्टल वर ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर ई-निविदेची अंतिम तारीख १०/०६/२०२४ होती. त्यानुसार पुढील कार्यवाही प्रस्तावित आहे.

मत्स्यव्यवसाय विभागाद्वारे मढ येथे RKVY(RASHTRIYA KRISHI VIKAS YOJANA) योजनेंतर्गत मढ तळपशा येथे विविध स्वरूपाच्या मूलभुत सुविधा देवून बंदर विकसित करण्यात आले आहे व वर्सोवा या ठिकाणी मत्स्यबंदर विकसित करणेबाबतचा प्रशासकीय मान्यतेस महाराष्ट्र सागरी मंडळ, मुंबई यांचेकडील प्रस्तावाचे अनुषंगाने कृषी व पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाद्वारे आवश्यक माहिती घेऊन पुढील कार्यवाही प्रस्तावित आहे. मासेमारी करून आलेल्या बोटीने मासे उतरवण्यासाठी चांगली जेटी व अन्य सोयी सुविधा उपलब्ध करणे, समुद्रलगतच्या दिव्यामुळे मासेमारीसाठी खोल समुद्रात जावे लागते त्यासाठी अतिरिक्त डिझेल लागते ते देऊन डिझेलचे परतावे अदा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच कोळीवाड्यातील मच्छीमार कुटुंबियांना नवीन घरे बांधण्यासाठी परवानगी देणे बाबतचे प्रस्तावांवर महापालिकेकडुन उचित कार्यवाही करण्यात येते.

(४) हे खरे नाही.

महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ यांचेमार्फत ससून गोदी मत्स्यबंदरात सुविधा निर्माण करण्याचे काम करण्यात येत आहे. मासेमारी करणारे तसेच मासळीचा व्यवसाय करणाऱ्या मत्स्यव्यवसायिकांना PMMSY(PRADHAN MANTRI MATSYA SAMPADA YOJANA) व जिल्हा नियोजन मंडळ यांचेकडील योजनांमार्फत सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात.

(५) व (६) मुद्दा क्र.१ प्रमाणे.

-----------------

## राज्यात मांस उद्योगामधून निर्माण होणाऱ्या टाकाऊ पदार्थांची प्रक्रिया करणारा प्रकल्प उभारण्याबाबत

**(३१) * २३७६९ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अनेक ठिकाणी मांस उत्पादन व विक्री करताना या मांसातील टाकाऊ पदार्थांची योग्य प्रकारे विल्हेवाट न लावता ते कचऱ्यामध्ये टाकण्यात येत असल्यामुळे आरोग्य विषयक तक्रारी निर्माण होतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू टाकाऊ पदार्थांवर प्रक्रिया करण्याचे तंत्रज्ञान राष्ट्रीय मांस संशोधन संस्थेने विकसित केल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू तंत्रज्ञानाचा वापर करून, मांसातील टाकाऊ पदार्थांपासून उपलब्ध होणारे तेल व प्रोटीन पावडरचा वापर अनुक्रमे बायोडिझेल व पाळीव प्राणी, मासे यांचेसाठी उपयुक्त खाद्य तयार करण्याकरीता करता येऊ शकतो, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील मांस उद्योगामधून निर्माण होणाऱ्या टाकाऊ पदार्थांची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्याच्या अनुषंगाने उपरोक्त नमूद तंत्रज्ञानाचा वापर करून राज्यात मिट वेस्टवर प्रक्रिया करणारा प्रकल्प राज्य शासन, स्थानिक प्राधिकारी संस्था अथवा खाजगी संस्थांच्या माध्यमातून राज्यात स्थानिक प्राधिकारी संस्था, शहर अथवा जिल्हानिहाय उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) हे खरे आहे.
(४) महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यामध्ये मालेगाव तालुका येथे मे. एस. आर ओ. बायो केमिकल हा खाजगी उद्योग आहे. सदर उद्योगामध्ये कत्तलखान्यातून निर्माण झालेल्या खाण्यास योग्य नसलेल्या टाकाऊ पदार्थांपासून कोन्ड्रॉयटीन सल्फेट पावडर आणि हेपॅरीन सोडीअम पावडर तयार करण्यात येते. तसेच चंद्रपूर जिल्ह्यातील बामणी प्रोटीन्स प्रा. लि. या उद्योगामध्ये कत्तलखान्यातून निर्माण झालेल्या खाण्यास योग्य नसलेल्या टाकाऊ पदार्थांपासून ओसिन, डायकॅल्शिअम फोस्फेट, कॅल्शिअम क्लोराइड पावडर तयार करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील १७००० सेतू केंद्रे पुन्हा सुरु करण्याबाबत

**(३२) * २३८१५ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आपले सरकार सेवा केंद्रामार्फत विविध प्रमाणपत्र, अनुज्ञाप्ती, परवाने, ७/१२ उतारे, रहिवासी दाखला व जात प्रमाणपत्र तसेच इतर ऑनलाईन सेवा पुरविण्यासाठी गरजू व बेरोजगार युवकांना सेतू केंद्रासाठी परवानगी दिली जात होती, परंतु सध्या राज्यातील सुमारे ३९००० सेतू केंद्रापैकी १७००० सेतू केंद्र बंद असल्याने नागरिकांची गैरसोय होत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एकीकडे शासन आपल्या दारी उपक्रम राबवून राज्य शासन शासकीय योजना व कागदपत्रे नागरिकांना एकाच ठिकाणी उपलब्ध करून देत आहे, तर दुसरीकडे राज्यातील काही सेवा केंद्र बंद असल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बंद असलेले सेतू केंद्र पुन्हा सुरु करुन नियमात बसणाऱ्या गरजू व बेरोजगार युवकांना केंद्र चालक म्हणून परवानगी मिळण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) आपले सरकार सेवा केंद्रांचे व्यवस्थापन शासन निर्णय दिनांक ०५/१२/२०१६ अन्वये महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाकडे सोपविण्यात आलेले आहे.

तसेच, सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १९/०१/२०१८ रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र/०२/५ व ०७ अनूसार आपले सरकार सेवा केंद्र वाटप व त्यांचे नियंत्रण तथा समन्वय संदर्भातील सर्व प्रशासकीय अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेले आहेत. तद्नुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयाकडे आपले सरकार सेवा केंद्राबाबत तक्रार प्राप्त झाल्यास अशा केंद्रावर कारवाई करण्यात येते. यास्तव राज्यातील कार्यरत व बंद स्थितीतील आपले सरकार सेवा केंद्राच्या आकडेवारीमध्ये वेळोवेळी बदल होत असतो.

शासन निर्णयातील तरतूदीप्रमाणे बंद स्थितीतील आपले सरकार सेवा केंद्र सुरु करण्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करुन आवेदन पत्र मागविण्यात येतात. त्यानुसार पात्र उमेदवारांना आपले सरकार सेवा केंद्राचे वाटप करण्याची कार्यवाही संबंधित जिल्हाधिकारी स्तरावर सतत सुरु असते.

दिनांक १९/०१/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये ठरवून दिलेल्या निकषांच्या अधिन राहून राज्यातील बंद स्थितीतील आपले सरकार सेवा केंद्रे सुरु करण्याबाबत राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांना दिनांक ३१/०५/२०२३, दिनांक १५/०९/२०२३ व दिनांक १८/०३/२०२४ रोजीच्या शासन पत्रान्वये निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार संबंधित जिल्हाधिकारी यांचेस्तरावरुन याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(४) लागू नाही.

-----------------

## पिंपळे गुरव (ता.पिंपरी, जि.पुणे) येथील काळुराम जलतरण तलाव पुवर्वत सुरु करण्याबाबत

**(३३) * २३४८६ श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळे गुरव (ता.पिंपरी, जि.पुणे) येथील काळुराम जलतरण तलाव बेबी टँक बंद असल्याने ऐन उन्हाळ्यात येथील लहान मुले पोहण्यापासून वंचित राहत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्येक जलतरण तलावावर लहान मुलांसाठी बेबी टँकची सुविधा असते मात्र, पिंपळे गुरव येथील बेबी टँक तीन महिन्यांपासून बंद असून सहा महिन्यापूर्वीच या तलावाची संपूर्ण दुरुस्ती केल्यामुळे बेबी टँकमध्ये गळती नसतानाही बंद ठेवण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पिंपळे गुरव येथील काळुराम जलतरण तलाव सहा महिने विनाकारण बंद ठेवणाऱ्या संबंधितांवर कारवाई करुन, सदर तलाव पुवर्वत सुरु ठेवण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील पिंपळे गुरव (जि.पुणे) येथील काळूराम जगताप जलतरण तलाव मुख्य तलावाची सहा महिन्यापूर्वी महानगरपालिकेमार्फत डेक, गटर व चेंजिंग रूमच्या टाइल्स बदलणे, ड्रेनेज लाईन दुरुस्त करणे सेफ्टी हॅंडरेल बदलणे, चेंजिंग रूमच्या सी. पी. फिटिंग बदलणे व प्लंबिंगचे काम इत्यादी किरकोळ दुरुस्तीची कामे करण्यात आली आहेत.

त्यावेळी बेबी पूल सुस्थितीत व कार्यान्वित असल्याने गळतीच्या कामकाजासाठी कुठल्याही दुरुस्तीची आवश्यकता नव्हती व अशी कोणतीही गळती विषयक दुरुस्ती करण्यात आलेली नाही. मागील तीन महिन्यापासून सदरबाबत तक्रार आली असल्याने पाहणी केली असता सदर बेबी पूलच्या इनलेट पाईप मध्ये गळती असल्याचे आढळून आले आहे. गळती दुरुस्तीचे काम मोठ्या स्वरूपाचे असल्याने त्यासाठी मुख्य तलाव बंद करून दुरुस्तीचे काम करावे लागणार होते. मुख्य जलतरण तलाव ऐन उन्हाळ्यात बंद करणे योग्य नसल्याने जलतरण तलावातील बेबी पूलाच्या गळतीचे दुरुस्तीचे काम उन्हाळा संपल्यानंतर त्वरित करण्याचे नियोजन होते. त्याअनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत दुरुस्ती विषयक काम चालू केले असून पुढील १५ दिवसात सदरचा बेवी पूल चालू करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## सीवूड (नवी मुंबई) येथील चाणक्य तलाव संरक्षित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आल्याबाबत

**(३४) * २३५६३ श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रवीण दटके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, श्री.गोपिचंद पडळकर, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सीवूड (नवी मुंबई) येथील टी एस चाणक्य सागरी प्रशिक्षण संस्थेच्या मागे असलेला १४.७४ हेक्टर क्षेत्र व्यापलेल्या चाणक्य तलाव हा मा.मुंबई उच्च न्यायालयाने संरक्षित क्षेत्र म्हणून घोषित केला असतानाही तेथील कांदळवनावर ज्वलनशील पदार्थ टाकून खारफुटी जंगल भूमाफियांकडून नष्ट करण्यात येत असून महानगरपालिकेच्या विकास आराखड्यात कांदळवन आरक्षण हटविण्यात आल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फ्लेमिंगो सिटी ओळख असलेल्या या शहराचा खाडी भाग व तेथील जैवविविधता लक्षात घेता मा.मुंबई उच्च न्यायालयाने सिडकोच्या ताब्यात असलेले खारफुटी प्रदेश वन विभागाच्या कांदळवन कक्षाकडे हस्तांतरीत करण्याचे निर्देश देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवी मुंबई महानगरपालिकेने महानगरपालिकेच्या विकास आराखड्यात कांदळवन आरक्षण हटविण्यात आल्यामुळे या परिसरातील जागा विकासकांना निवासी बांधकाम व गोल्फ कोर्स उभारण्यासाठी हस्तांतरीत करण्यासाठी सिडकोला हवी आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कांदळवन परिसरातील पाणथळ क्षेत्रातील जल स्त्रोत्र भुमाफियांकडून बंद करण्यात येत असून चाणक्य तलाव हे संरक्षित क्षेत्र असूनही सिडकोने तलावाच्या देखभाल व सुरक्षिततेकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष केल्यामुळे महानगरपालिकेच्या या विकास आराखड्यावर सर्वसामान्य नागरिक आणि पर्यावरण प्रेमींनी नाराजी व्यक्त करून मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाचे पालन करण्याची मागणी करत आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे सिडकोकडून खारफुटी प्रदेश वन विभागाच्या कांदळवन कक्षाकडे हस्तांतरीत करण्याबाबत तसेच चाणक्य तलावाच्या परिसरातील व २२ किलोमीटरच्या कांदळवनाचे व तेथील जैवविविधतेचे भूमाफियांपासून संरक्षण करण्यासाठी व सदर क्षेत्र पाणथळ क्षेत्र घोषित करण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) कांदळवनावर ज्वलनशील पदार्थ टाकून खारफुटी जंगल भूमाफियांकडून नष्ट करण्यातबाबतच्या प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने महसूल व वन विभाग, सिडको व नवी मुंबई महानगरपालिकेचे अधिकारी यांचे मार्फत स्थळपाहणी करण्यात आली आहे. सदर ठिकाणची वस्तुस्थिती तपासून सत्यता आढळुन आल्याने मंडळ अधिकारी, बेलापुर यांचेमार्फत NRI पोलीस ठाणे, बेलापुर येथे पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ च्या कलम १५(१) अन्वये अज्ञात व्यक्ती विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ च्या तरतुदीनुसार विकास योजना तयार करुन कलम २६ अन्वये प्रसिदध करणे तसेच विहित कालावधीत प्राप्त सूचना व हरकतीवर नियोजन समितीने सुनावणी देऊन नियोजन प्राधिकरणास अहवाल सादर करणे त्यावर नियोजन प्राधिकरणाने प्रारुप विकास योजनेत आवश्यक ते बदल करुन विकास योजना कलम २८(४) प्रसिध्द केल्यानंतर कलम ३० अन्वये प्रारुप विकास योजना शासनास मंजूरीस्तव सादर केल्यानंतर विकास योजना अंतिम मंजुरीबाबत उक्त अधिनियमाचे कलम ३१ अन्वये शासनाने निर्णय घ्यावयाचे अभिप्रेत आहे.

त्यानुसार सदर प्रकरणी नवी मुंबई महानगरपालिकेने महानगरपालिका क्षेत्राकरीता प्रारुप विकास योजना कलम २६ (१) अन्वये प्रसिध्द करुन त्यानुसार पुढील वैधानिक कार्यवाही करुन कलम ३० अन्वये शासनास मंजूरीस्तव सादर केली आहे. सदरच्या प्रारुप विकास योजनेवर संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य यांचा अहवाल मागविण्यात आला असून त्यानुसार नगर रचना संचालनालयाचे स्तरावर विकास योजना संबंधी छाननी करण्यात येत असून अद्याप विकास योजनेस शासनाने मंजुरी दिली नसल्याने आरक्षण हटविण्यात आले असे म्हणता येणार नाही.

(२) हे खरे आहे, मा.उच्च न्यायालयाने रीट याचिका क्र- ३२४६/२००४ च्या अनुषंगाने कांदळवन क्षेत्र वन विभागाकडे हस्तांतरित करण्याचे आदेश पारित केले आहेत. त्या अनुषंगाने सिडको तर्फे ठाणे तालुक्यातील सुमारे १४५८ हेक्टर (अंदाजे) जागा हस्तांतरित करण्यात आलेली असून याबाबत शासन, महसूल व वन विभागाने दिनांक २० जानेवारी २०२१ रोजी प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेनुसार सिडको क्षेत्रातील ठाणे तालुक्यातील एकूण १४५८ हेक्टर कांदळवन क्षेत्र हे राखीव वने म्हणून घोषित करण्यात आलेले असल्याचे सिडकोने कळविले आहे.

(३) हे खरे नाही.

(४) नवी मुंबई महानगरपालिकेने महानगरपालिका क्षेत्राकरीता प्रारुप विकास आराखड्यावर जनतेच्या हरकती/ सुचना प्राप्त झाल्या आहेत.

(५) मा.उच्च न्यायालय यांनी रीट पिटीशन नंबर (Writ Petition) ३२४६/२००४ च्या अनुषंगाने खारफुटी क्षेत्र वन विभागाकडे हस्तांतरित करण्याचे आदेश पारित केले आहेत. त्या अनुषंगाने सिडको तर्फे ठाणे तालुक्यातील सुमारे १४५८ हेक्टर (अंदाजे) हस्तांतरित करण्यात आलेली असून याबाबत महसूल व वन विभाग महाराष्ट्र शासन यांनी दिनांक २० जानेवारी २०२१ रोजी प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेनुसार सिडको क्षेत्रातील ठाणे तालुक्यातील एकूण १४५८ हेक्टर कांदळवन क्षेत्र हे राखीव वने म्हणून घोषित करण्यात आलेले आहे.

(६) प्रश्न उध्दवत नाही.

-----------------

## के.डी.कंपाऊंड, कांदिवली (प), मुंबई येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत अनियमितता झाल्याबाबत

**(३५)** * **२४१५७ श्री.जयंत पाटील, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) के.डी.कंपाऊंड, कांदिवली (प), मुंबई येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या भूखंडावर साई आझाद सहकारी गृहनिर्माण संस्थेद्वारे राबविण्यात येत असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत अनियमितता झाल्याप्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे एप्रिल, २०२४ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान

आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे सविस्तर लेखी तक्रार सादर केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त महानगरपालिकेच्या उक्त भूखंडावर साई आझाद सहकारी गृहनिर्माण संस्थेद्वारे राबविण्यात येत असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत झालेल्या अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

मुंबईतील कांदिवली (प) के.डी.कंपाऊंड येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या साई आझाद सहकारी गृहनिर्माण संस्थेद्वारे राबविण्यात येत असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत अनियमितता झाल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २४/०४/२०२४ रोजी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडे तक्रार अर्ज केलेला आहे.
(२) प्राप्त तक्रार अर्जाच्या अनुषंगाने प्रमुख अभियंता (दक्षता) यांच्यामार्फत केलेल्या निरिक्षण अहवालानुसार प्रथम दर्शनी अनियमितता झाल्याचे आढळून आले आहे. त्यानुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार तयार करण्यात आलेले प्रारुप परिशिष्ट २ दिनांक १९/०४/२०२४ रोजी रद्द करण्यात आले आहे. त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिका स्तरावर सदर प्रकरणी चौकशी करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गिरगांव (मुंबई) येथील केळेवाडी पुलाची पुनर्बांधणी करण्याबाबत

**(३६)** * **२३१८३ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गिरगांव (मुंबई) येथील केळेवाडी पूल सन २०१९ मध्ये पाडल्यानंतर त्याची पुनर्बांधणी करण्यासाठी एक गिरगावकर या संस्थेने व रहिवाशांनी नगरसेवक, स्थानिक लोकप्रतिनिधी यांचेकडे तोंडी व लेखी मागणी करुनही अद्याप काम सुरु केले नसल्यामुळे मा.मुख्यमंत्री यांचेकडे लेखी निवेदन देऊन पुलाची पुनर्बांधणी करण्यात यावी अशी मागणी दिनांक ४ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पूल नसल्यामुळे गिरगावात ये-जा करणाऱ्या नागरिकांना महर्षी कर्वे रोड मार्ग ओलांडून जावा लागत असून, या मार्गावरून कायम मोठी वाहतूक होत असल्याने गत तीन ते चार वर्षांत काही अपघातही झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गत ५ वर्षांमध्ये पुलाची पुनर्बांधणी न करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तेथील स्थानिक रहिवाशांची व प्रवाशांची होणारी गैरसोय दूर करण्यासाठी सदर पुलाची पुनर्बांधणी करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

काळाबादेवी वाहतूक विभागाचे कार्यक्षेत्रातील घोडागाडी जंक्शन ते सैफी हॉस्पीटल जंक्शन (महर्षि कर्वे रोड) दरम्यान गत तीन ते चार वर्षात १ गंभीर व ५ किरकोळ अपघात झाल्याची नोंद अभिलेखात आहे.

(३) केळेवाडी पादचारी पूल अत्यंत जीर्ण अवस्थेत असल्याने सन २०१९ मध्ये सहाय्यक आयुक्त डी विभाग, कार्यालयामार्फत निष्कासित करण्यात आला होता.कोविड १९ च्या प्रार्दुभावामुळे सन २०२१ पर्यंत सदर काम होऊ शकले नाही. तद्नंतर २०२२ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळवून माहे ऑगस्ट २०२३ मध्ये पूलाचे प्रत्यक्ष काम चालू करण्यात येणार होते, परंतु सदर पूलाचे बांधकाम करण्यासाठी केळेवाडी गल्लीतील स्थानिक रहिवाश्यांनी विरोध दर्शविल्यामुळे पुलाचे बांधकाम थांबविण्यात आले.

(४) स्थानिक रहिवाशांची व प्रवाशांची होणारी गैरसोय दुर करण्यासाठी तसेच स्थानिक रहिवाशांनी केलेल्या सुधारित मागणीनुसार नवीन पादचारी पुल बांधण्याबाबतची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बेस्ट उपक्रमातील कार्यरत तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची विविध देणी अदा करण्याबाबत

**(३७)** * **२३९९१ श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून बेस्ट उपक्रमातील कार्यरत आणि निवृत्त कर्मचाऱ्यांना गत दोन वर्षांपासून उपदान, रजेचे रोखीकरण यांसह विविध देणी अद्यापही मिळाली नसल्याचे माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रक्कम दीड हजार कोटी रुपये असून यामध्ये निवृत्त कर्मचाऱ्यांची एकूण रुपये ४५७ कोटीचे उपदान थकीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून बेस्ट उपक्रमास मिळणाऱ्या अनुदानानंतरच ही रक्कम अदा केली जाऊ शकते परंतु, अनुदान कमी प्रमाणात मिळत असल्यामुळे ही देणी थकीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बेस्ट उपक्रमास मोठ्या प्रमाणात अनुदान मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

बेस्ट उपक्रमातील निवृत्त कर्मचाऱ्यांचे माहे सप्टेंबर, २०२२ पासून उपदान, अंतिम देयके, रजा प्रवास भत्ता व रजा रोखीकरणाची देयके तसेच वित्तीय वर्ष सन २०१६ ते २०२१ या कालावधीतील वेतन करारानुसार निवृत्त/कार्यरत कर्मचाऱ्यांची थकबाकी प्रलंबित आहे.

(२) हे खरे आहे.

कमी उत्पन्न व अपुऱ्या अनुदानामुळे प्रत्येक महिन्याला निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांमुळे बेस्ट उपक्रमाची थकीत रक्कम वाढत चालली आहे.

(३) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत बेस्ट उपक्रमास सहाय्य करण्यासाठी सन २०१२-१३ ते सन २०२३-२४ पर्यंत एकूण १०,४९५.५९ कोटी इतक्या भरीव रकमेचे अधिदान करण्यात आले आहे. तसेच, सन २०२४-२५ च्या अर्थसंकल्पात रुपये ८०० कोटी इतक्या रकमेची तरतूद करण्यात आली असून, त्यापैकी दिनांक १४/०६/२०२४ पर्यंत रुपये २४७ कोटी इतकी रक्कम बेस्ट उपक्रमास अधिदानीत करण्यात आली आहे.

(४) प्रलंबित देयके देण्यासाठी अनुदान / निधी उपलब्ध करुन देण्याची विनंती बृहन्मुंबई महानगरपालिकेस बेस्ट उपक्रमामार्फत करण्यात आली असून, त्याचा पाठपुरावा करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कोट्यवधी रुपयांच्या मालमत्ता कर थकबाकीच्या वसुलीबाबत

**(३८) * २३१५० श्री.प्रसाद लाड, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरातील बड्या कंपन्यांनी तसेच उद्योजकांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेचा कोट्यवधी रुपयांचा मालमत्ता कर थकविला असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ च्या तिसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाच्या कर निर्धारण व संकलन विभागाने मालमत्ता कर वसुलीसाठी कठोर कारवाई करण्यास सुरुवात केली असतानाही गत १४ वर्षांपासून बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांच्या बंगल्याचा ४.५६ लाख रुपये मालमत्ता कर थकीत असल्याची बाब माहिती अधिकारात माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेस चालू आर्थिक वर्षात मालमत्ता करात वाढ करण्यास शासनाने मनाई केली असून केवळ १० कंपन्यांकडे असलेली २८० कोटी रुपयांची मालमत्ता कर थकबाकी वसूल करण्यात बृहन्मुंबई महानगरपालिकेला अपयश आले असून या थकबाकीदारांत पाच निवासी आणि पाच व्यावसायिक मालमत्ता करदात्यांचा समावेश असल्याची बाब दिनांक ९ मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, निर्धारित कालावधीत तसेच आर्थिक क्षमता असूनही मालमत्ता कर न भरणाऱ्या मोठ्या कंपन्यांना व उद्योजकांना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कर निर्धारण विभागाने नोटीसा बजाविल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मोठ्या कंपन्या तसेच उद्योजक नोटीसा बजावूनही मालमत्ता कर भरत नसल्याने त्यांच्या मालमत्ता सील करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेस मालमत्ता कर वसुलीचे उद्दिष्ट्य गाठण्यात येत असलेल्या अपयशाची कारणे काय आहेत, अनेक वर्षे मालमत्ता कर न भरलेल्यांवर महानगरपालिका प्रशासन कारवाई

न करण्याची कारणे काय आहेत, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कोट्यवधी रुपयांच्या मालमत्ता कर थकबाकीच्या वसूलीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे अंशत: खरे आहे.
(४) हे खरे आहे.
(५) मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ मधील कलम २०३ ते २०६ च्या तरतूदीनुसार महानगरपालिकाद्वारे मालमत्तांची अटकावणी व जप्ती, लिलाव इ. कारवाई करण्यात येत आहे.
(६) सन २०२३-२४ मध्ये रुपये ६२०० कोटीची वार्षिक मागणी देयके निर्गमित करण्यात आली. दिनांक २५/०५/२०२४ पर्यंत एकूण रुपये ४८५६ इतकी कर वसुली करण्यात आली. म्हणजेच ७८.३२% इतके कर संकलन करण्यात आले. मा.सर्वोच्च न्यायालय येथे दाखल याचिका क्र.१७००९/२०१९ मधील आदेशानुसार बृहन्मुंबई महानगरपालिका अंतिम कर देयक निर्गमित करत नाही. तोपर्यंत करदाते मागणीच्या ५०% अधिदान करत आहेत. मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम २०२ च्या तरतुदीनुसार ५०% कर भरणा न केलेल्या थकीत मालमत्ता कराच्या देय दिनांकापासून २% प्रतिमाह या दराने संगणकीय प्रणालीद्वारे दंड आकारणी करण्यात येते.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## देवनार (मुंबई) डम्पिंग ग्राउंडमधील विनाप्रक्रिया घनकचऱ्यामुळे उद्भवणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्याबाबत

**(३९) * २३८९२ श्री.अंबादास दानवे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवनार (मुंबई) येथील डम्पिंग ग्राउंडमध्ये दररोज अंदाजे ९ हजार मेट्रीक टन घनकचरा, वैद्यकीय कचरा, ई-वेस्ट कचरा महानगरपालिकेच्या कंत्राटदारामार्फत कोणतेही विलगीकरण न करता तसेच रासायनिक अथवा जैविक प्रक्रिया न करता सदर डम्पिंग ग्राउंडमध्ये टाकण्यात येत असल्याचे माहे मे, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे उक्त परिसरातील नागरिकांमध्ये खोकला, क्षयरोग, कॅन्सर व श्वसनाच्या विकारामध्ये वाढ झाल्याने त्यांचे आयुर्मान सरासरी ३९ वर्षे झालेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत नागरिकांनी महानगरपालिकेस अनेक तक्रारी करुनही वर्षोनुवर्षे एकच कंत्राटदार काम करत असून त्याचे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांशी आर्थिक संगनमत असल्याने त्यांचेवर कारवाई करण्यास जाणीवपुर्वक दुर्लक्ष होत असल्याने उक्त परिसरात पर्यावरणाचा व आरोग्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणतीही प्रक्रिया न करता देवनार (मुंबई) येथील डम्पिंग ग्राउंडमध्ये कचरा टाकणाऱ्या संबंधित कंत्राटदारावर गुन्हा दाखल

करुन त्यांचा महानगरपालिकेच्या काळ्या यादीत समावेश करण्याबाबत व नागरिकांनी तक्रारी करुन कारवाई करण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना निलंबित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, ज्या ठिकाणी सदर डम्पिंग ग्राउंड करीता जागा निश्चिती केली जाते त्याचवेळी स्थानिक नागरिक त्याकरीता विरोध करत असल्याने जागोजागी कचऱ्याचे ढीग वाढत असून परिसरात रोगराई पसरत असल्याची बाब निदर्शनास आली असून, मुंबईतून दैनंदिन निघणारा हजारो क्विंटल कचऱ्याचा प्रश्न कायमस्वरूपी संपुष्टात आणण्याकरीता महानगरपालिका व शासन यांनी समन्वय साधून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत कार्यरत असणाऱ्या दवाखान्यांत उपचार घेतलेल्या रुग्णसंख्येत मागील ३ वर्षांच्या खोकला, क्षयरोग व श्वसनाच्या विकारामध्ये वाढ झाल्याचे आढळुन आले नाही.
(३) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत घन कचरा व्यवस्थापनाबाबत ऑनलाईन पध्दतीने विहित प्रक्रिया राबवून निविदा प्रक्रिया पारदर्शकपणे राबविण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत निर्माण होणाऱ्या व क्षेपणभूमीमध्ये येणाऱ्या एकूण सुमारे ६४०० मे. टन कचऱ्यापैकी कांजूर नागरी घन कचरा प्रक्रिया केंद्र येथे सद्य:स्थितीत दररोज सुमारे ४५००-४८०० मे. टन इतक्या नागरी घन कचऱ्यावर बायोरिएक्टर लॅडफिल तंत्रज्ञानाद्वारे शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया केली जाते व सुमारे १००० मे. टन इतक्या नागरी घन कचऱ्यापासून शास्त्रोक्त पध्दतीने खत निर्मिती केली जाते.

उर्वरित सुमारे ६०० मे. टन प्रतिदिन कचऱ्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करण्याकरीता देवनार क्षेपणभूमी येथे कचऱ्यापासून ऊर्जा निर्मिती करण्याचा प्रकल्प विकसित करण्यात येत आहे. सदर प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर असून दिनांक ०४/१०/२०२५ पासून कार्यरत होणे अपेक्षित आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चिंचपाडा (कल्याण) येथील मंगलमूर्ती विकासकाने तीन अनधिकृत इमारती उभारल्याबाबत

**(४०) * २३६१९ अॅड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिंचपाडा (कल्याण) येथील बाबु साळुंखे, बाकाबाई केणे, येसूबाई भंडारे आणि राईबाई पाटील यांच्या मालकीच्या १८ गुंठे जमिनीवर भूमाफिया कृष्णा म्हात्रे, भगवान महादू म्हात्रे आणि अनिल म्हात्रे यांनी बेकायदा कब्जा करुन मंगलमूर्ती विकासक या नावाने जय हनुमान प्लाझासह तीन इमारती उभ्या केल्या असल्याचे माहे एप्रिल,२०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारती उभारताना महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता, रेरा नोंदणी न करता इमारत उभारुन सदर भूमाफियांनी दुकान गाळे, फ्लॅट विकल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महानगरपालिकेकडून बेकायदा कब्जा घेतल्याप्रकरणी कोणतीच कारवाई न झाल्यास मूळ मालक बाबु साळुंखे आणि बाकाबाई केणे यांनी उपोषण करण्याचा इशारा देऊनही महानगरपालिकेचे वॉर्ड ऑफिसर यांनी बेकायदा इमारती पाडण्यासाठी डीसीपी कार्यालयाकडे पोलीस बंदोबस्त मिळावा याकरीता पत्रव्यवहार करुनही अदयाप कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांकडून बेकायदा इमारत बांधकामांना अभय दिले जात असल्याने बेकायदा बांधकामांवर कारवाई करण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बेकायदा बांधकामास अभय देणाऱ्या संबंधित दोषीं व भुमाफियांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) श्रीमती बाकाबाई केणे यांच्या दिनांक १४/०९/२०२० रोजीच्या महानगरपालिका प्रशासनात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने पाहणी केली असता, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील चिंचपाडा भागात मंगलमुर्ती विकासक या नावाने जय हनुमान प्लाझा सह ३ इमारती उभ्या राहिल्याचे महानगरपालिकेच्या निदर्शनास आले आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने स्थळ पहाणी मध्ये बांधकाम निदर्शनास येताच महानगरपालिकेमार्फत सदर बांधकामधारकास अधिनियमातील तरतूदीनुसार दिनांक १०/११/२०२० रोजी नोटीस बजावण्यात आली.

- तसेच, त्यानंतर दिनांक १७/०७/२०२१ रोजी विठ्ठलवाडी पोलीस स्टेशन येथे बांधकामधारक विरुध्द गुन्हा दाखल करण्यात येऊन अधिनियमातील तरतूदीनुसार नोटीस बजावण्यात आल्या.
- तथापि, सदर काळात कोव्हीड ची परिस्थिती असल्याने तात्काळ कारवाई होऊ शकली नाही, दरम्यान इमारतीच्या काही भागात रहिवास वापर सुरु झाला. त्यामुळे रहिवास मुक्त भागावर दिनांक १०/०१/२०२४ निष्कासनाची कार्यवाही करण्यात आली.
- सदर इमारती रहिवास मुक्त होण्याकरीता विकासक व रहिवासी यांना सदनिका रिक्त करण्याकरीता महानगरपालिकेमार्फत अंतिम नोटीस देण्यात आली असून, सदरील इमारती रहिवास मुक्त झाल्यावर सदर इमारती निष्कासन करण्याचे महानगरपालिकेचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील शासकीय निवासस्थानांची पाणी देयके थकीत असल्याबाबत

**(४१) * २३६३४ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मंत्र्यांची निवासस्थाने, शासकीय विश्रामगृहे, मा.मुख्यमंत्र्यांचे निवासस्थान यांची पाणी देयकाची रुपये ५ लाख १२ हजार रुपयांची थकबाकी गत तीन वर्षांपासून प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०२४ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने यासंदर्भात माहिती घेऊन सदरील थकबाकी बृहन्मुंबई महानगरपालिकेला त्वरित अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) मुंबईतील मंत्र्यांची निवासस्थाने, शासकीय विश्रामगृहे व वर्षा निवासस्थानाच्या माहे एप्रिल, २०२४ पर्यंतच्या जल देयकाची एकूण थकबाकी रुपये २,४६,५९,३२०/- इतकी आहे, त्यापैकी रुपये १,२६,२९,७००/- इतक्या रकमेचा भरणा दिनांक ०६/०४/२०२४ रोजी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात आला आहे.
(२) सद्य:स्थितीत शासकीय विश्रामगृहाच्या जल देयकाची एकूण रुपये १,२०,२९,६२०/- इतकी थकबाकी प्रलंबित असून, त्याचा भरणा करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील अनधिकृत फेरीवाल्यांच्या पुनर्वसनाचे धोरण ठरविण्याबाबत

**(४२) * २३१३३ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहर व उपनगरातील फुटपाथवर विनापरवाना बसणाऱ्या फेरीवाल्यांची संख्या दिवसेंदिवस वाढतच असून फेरीवाल्यांच्या अतिक्रमणामुळे पादचाऱ्यांच्या मूलभूत हक्कांवर निर्बंध येत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रेल्वे स्थानक परिसरात १५० मीटरपर्यंत फेरीवाल्यांना प्रतिबंध करण्यात आला आहे परंतु सदर नियमांचे उल्लंघन करुन अनधिकृत फेरीवाले व्यवसाय करित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू अनधिकृत फेरीवाले हे हौसिंग सोसायटी, परवानाधारक दुकानांसमोर, पदपथ अशा जागांवर अतिक्रमण करून व्यवसाय करित असल्यामुळे परवानाधारक व्यावसायिक यांच्या हक्कांवर अतिक्रमण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुंबईतील अनधिकृत फेरीवाल्यांमुळे होत असलेली वाहतूक कोंडी पाहता सदर फेरीवाल्यांच्या पुनर्वसनासाठी धोरण ठरविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे,

मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील काही ठिकाणी फेरीवाल्यांची संख्या वाढल्याचे निदर्शनास येत असून मुंबई शहर व उपनगरातील फुटपाथवर विनापरवाना बसणाऱ्या फेरीवाल्यांवर बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ मधील कलम ३१४ (क) नुसार कारवाई करण्यात येते.

(२) मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार मुंबईतील रेल्वे स्थानकापासून १५० मीटर अंतर परिसरात नियमांचे उल्लंघन करुन अनाधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्या पथविक्रेत्यावर बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येते.

(३) सदरहू अनधिकृत फेरीवाले हे हौसिंग सोसायटी, परवानाधारक दुकानांसमोर, पदपथ अशा जागांवर व्यवसाय करीत असल्याचे आढळून आले आहे.

(४) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र.६५२/२०१७ मध्ये दिनांक ०१/११/२०१७ रोजी दिलेल्या आदेशांच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेसाठी ‘‘फेरीवाला योजना’’ अंतिम करण्याची कार्यवाही महानगरपालिकेच्या स्तरावर सुरू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पिंपरी (जि.पुणे) येथील यशवंतराव चव्हाण मेमोरीयल रुग्णालयात समन्वयाचा अभाव असल्याबाबत

**(४३) * २३४९३ श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी (जि.पुणे) येथील यशवंतराव चव्हाण मेमोरियल रुग्णालयात डॉक्टर, रुग्ण आणि सुरक्षा व्यवस्था यांच्यामध्ये समन्वयाचा अभाव असल्याने सदर रुग्णालयात वारंवार तक्रारी होत असल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयातील सर्व विभागांचा आढावा घेऊन नागरिकांना पुरेशी वैद्यकीय सुविधा पुरविण्यासाठी शासनाकडून कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) वायसीएम रुग्णालयात डॉक्टर, रुग्ण आणि सुरक्षा व्यवस्था यांच्यामध्ये समन्वयाचा अभाव आहे, हे खरे नाही.

तथापि, माहे मार्च, २०२४ मध्ये तातडी सेवा विभागात रुग्णाच्या नातेवाईकांनी दुखापतीचे प्रमाण वाढवून देण्याचा आग्रह डॉक्टरांकडे केल्याने व त्यास डॉक्टरांनी नकार दिल्याने रुग्णाच्या नातेवाईकांनी डॉक्टरांना धक्काबुक्की केल्याची घटना घडली होती.

(२) सर्व विभागांशी वेळोवेळी समन्वय साधून चांगल्या दर्जाची वैद्यकीय सुविधा रुग्णांना उपलब्ध करुन दिली जात आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डोंबिवली एमआयडीसीमधील काही कंपन्या प्रक्रियेविना रासायनिक पाणी सोडत असल्याबाबत

**(४४) * २३५५८ श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रवीण दटके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, श्री.गोपिचंद पडळकर, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.अंबादास दानवे, ॲड.निरंजन डावखरे, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (जि.ठाणे) एमआयडीसीच्या काही कंपन्यांनी प्रक्रिया न करता रासायनिक पाणी नाल्यात सोडल्यामुळे त्या कारखान्यावर प्रदूषण नियंत्रण मंडळ व कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने संयुक्त कारवाई केली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रदूषण नियंत्रण मंडळ व कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने केलेल्या कारवाईचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, डोंबिवली येथील एमआयडीसी परिसरातील नाल्यामध्ये निळया रंगाचे विषारी केमिकलयुक्त पाणी सोडल्यामुळे आजुबाजूच्या नागरिकांना केमिकलच्या उग्र वासाने श्वसनाचा त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, एमआयडीसीतील केमिकल कंपन्यांच्या प्रदुषणामुळे यापुर्वी या परिसरात हिरवा व नारंगी रंगाचा पाऊस पडल्याचे व केमिकलयुक्त रसायनामुळे या परिसरातील रस्ते गुलाबी झाल्याच्या घटना घडल्या असून रासायनिक कंपन्यांकडून विषारी रासायनिक पाणी हे चेंबर मध्ये न सोडता एमआयडीसी परिसरातील नाल्यामध्ये सोडले जात असून प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकारी यांच्या संगनमतामुळे या घटना घडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विषारी रासायनिक पाणी नाल्यामध्ये सोडणाऱ्या कंपनीवर व यासाठी जबाबदार असलेल्या प्रदूषण नियंत्रण मंडळातील संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) प्रश्नाधीन विषयाबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी केलेल्या संयुक्त स्थळ पाहणीदरम्यान सोनारपाडा येथील आर.के. गोडाऊन जवळ जिन्स वॉशिंगचा उद्योग म.प्र.नि.मंडळाचे संमतीपत्र न घेता व सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेशिवाय कार्यरत असल्याचे निदर्शनास आले होते. त्यानुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जिन्स वॉशिंगच्या उद्योगास दिनांक १८/०४/२०२४ रोजी बंदचे आदेश दिले असून, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने उद्योग सील करण्यात आला आहे.

(४) हे खरे नाही.

(५) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी केलेल्या स्थळ पाहणीच्या अनुषंगाने कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने दिनांक ०३/०४/२०२४ रोजी सदर जिन्स

वॉशिंगचा उद्योग सील केला असून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सदर उद्योगास दिनांक १८/०४/२०२४ रोजी बंदचे आदेश देण्यात आले आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कुर्ला (मुंबई) येथे क्रीडा संकुल उभारण्याबाबत

**(४५)** * **२३१५९ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुर्ला (मुंबई) येथील दुग्धविकास विभागाच्या मालकीच्या भूखंडावरील मदर डेअरी बंद झाल्याने सदर रिक्त भूखंडावर वांद्रे कुर्ला संकुलाच्या धर्तीवर व्यावसायिक संकुल (मिनी बांद्रा कुर्ला संकुल) उभारण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दिनांक २८ जानेवारी, २०२४ रोजी जाहीर केले असून त्यास स्थानिक रहिवाशांनी मोठ्या प्रमाणावर विरोध दर्शवून आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भुखंडावर क्रीडा संकुल उभारण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी व रहिवाशांनी माहे जानेवारी, २०२४ मध्ये मा.मुख्यमंत्री यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक १२ डिसेंबर, २०२३ रोजीच्या १५५ व्या बैठकीत ठराव क्र.१६६४ अन्वये बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रामधील शासनाच्या दुग्ध विकास विभागाच्या ताब्यात असलेल्या मौजे कुर्ला येथील (मदर डेअरी) भुमापन क्र.२२९/१/१ नगर भुमापन क्र.२ येथील सुमारे १०.४६ हेक्टर भूखंडाचा विकास वांद्रे-कुर्ला संकुलाच्या धर्तीवर करण्याचा ठराव केला होता.तथापि, कृषी व पदुम विभागाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला सदर जमीन हस्तांतरीत केलेली नाही.
(२) होय, हे खरे आहे.

सन्माननीय स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ३०/०१/२०२४ रोजीच्या पत्राद्वारे आयुक्त, दुग्धव्यवसाय यांचेकडे कुर्ला येथील भूखंडावर क्रीडा संकुल उभारण्याची मागणी केली होती.
(३) व (४) कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या दिनांक १० जून, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये, आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास विभागाच्या अखत्यारीतील प्लॉट न.२, सर्व्हे नं.२२९, मातृदुग्धशाळा, कुर्ला येथील ८.५ हेक्टर जमीन धारावी पुनर्वसन प्रकल्प/झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करणेसाठी महसूल व वन विभागास दुग्धव्यवसाय विकास विभागाकडून प्रत्यार्पित करण्यात आली आहे.

-----------------

## ठाणे शहरातील मेट्रो-४ प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(४६)** * **२३९९३ श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातून जाणाऱ्या वडाळा- कासारवडवली - गायमुखपर्यंत असलेल्या मेट्रो-४ प्रकल्पाचे काम नियोजित वेळेत पूर्ण होत नसल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मेट्रो प्रकल्पाचे काम कधीपर्यंत पूर्ण होणार आहे तसेच सदर कामांमुळे रस्ता नादुरुस्त झाला असून रस्त्याची दुरवस्था व मेट्रो प्रकल्पाचे अपूर्ण अवस्थेतील कामांमुळे घोडबंदर रस्त्यावरुन प्रवास करणाऱ्या तसेच तेथील परिसरातील नागरिकांना वाहतूक कोंडीच्या समस्येला सामोरे जावे लागत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मेट्रोच्या कामांमुळे होणाऱ्या वाहतूक कोंडीचा त्रास अजून अनिश्चित काळापर्यंत नागरिकांना सहन करावा लागणार असल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन ठाणे शहरातून जाणाऱ्या वडाळा- कासारवडवली - गायमुखपर्यंत असलेल्या मेट्रो-४ प्रकल्पाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत तसेच वाहतूक कोंडीच्या समस्येचे निराकरण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) मेट्रो प्रकल्पांतर्गत सुरु असलेल्या भाईंदरपाडा उड्डाणपुलाच्या कामामुळे गायमुख परिसरात अंशत: वाहतूक कोंडी होत आहे. घोडबंदर रस्त्यावरील सेवा रस्त्याची देखभाल ठाणे महानगरपालिका आणि घोडबंदर रस्त्यावरील २ ऱ्या व ३ ऱ्या मार्गिकेची तसेच उड्डाणपुलांची देखभाल सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित येते. घोडबंदर रस्त्याच्या १ ल्या व ४ थ्या लेनची देखभाल ही मेट्रो मार्गिका-४ मार्फत इतर शासकीय यंत्रणांशी समन्वय साधून करण्यात येत आहे. मान्सून पुर्व कामामध्ये सदरहू रस्त्याचे परिक्षण करुन रस्ता वाहतूकीसाठी सुस्थितीत करण्यात आला आहे.

(३) व (४) घोडबंदर रस्त्यावरील सुमारे ९०% लांबीमधील सुरक्षा बॅरिकेड्स काढण्यात आलेले आहेत अथवा मेट्रो खांबालगत सरकवून ठेवण्यात आलेले आहेत. ज्यामुळे घोडबंदर रस्त्याच्या मुळे मार्गिका वाहतूकीसाठी खुल्या झालेल्या आहेत. मेट्रो मार्ग-४ प्रकल्प स्थापत्य कामाच्या कंत्राटदारांना उर्वरीत काम विहित मुदतीत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

वाहतूक सुरक्षाविषयक फलक, इशारा दिवे, वाहतूक नियंत्रण सेवक इत्यादींची व्यवस्था वाहतूक पोलीसांशी समन्वय साधून करण्यात येत आहे.

मेट्रो मार्ग क्र. ४ चे स्थापत्य व अभियांत्रिकी कामे माहे एप्रिल, २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.